# रामदासांचे वैश्विक रामराष्ट्र

लेखक
प्राचार्य डॉ. अनिल सहस्रबुद्धे

प्रकाशक
आनंदोत्सव चॅरिटेबल ट्रस्ट, अहमदनगर
महाराष्ट्र, भारत
प्रकाशन मंच

**रामदासांचे वैश्विक रामराष्ट्र (वैचारिक तथा तात्त्विक मंथन)**
Ramdasanche Vaishwik Ramrashtra
(Philosophical and Thoughtfull Discussion)

**लेखक**
**प्राचार्य डॉ. अनिल सहस्रबुद्धे**

© सौ. उषा अनिल सहस्रबुद्धे
मो. ९८५०७३१६४०

**प्रकाशक :** आनंदोत्सव प्रकाशन मंच
आनंदोत्सव चॅरिटेबल ट्रस्ट
'आई', समर्थनगर, श्रीरामचौक,
पाईपलाईन रोड, अहमदनगर ४१४००३
दूरध्वनी : (०२४१) २४२४१६७
भ्रमण भाष- ९८८१५००९४२
usahasrabuddhe@gmail.com
Website - www.anilsahasrabuddhe.com

**प्रथमावृत्ती :** २०२२

**टाईपसेटींग :**
श्रीपाद कुलकर्णी, अहमदनगर
मो. ९८५०२३२८९०

**मुद्रक :** कुलकर्णी टाईपसेटर्स, अहमदनगर

**मूल्य** ११०/-

विशेष निवेदन : 'आनंदोत्सव'प्रकाशन मंच केवळ, प्रकाशनार्थ मंच, विनामूल्य सेवा उपलब्ध करून देतो. ग्रंथनिर्मिती, वितरण, आयव्यय याशी आनंदोत्सव चॅरिटेबल ट्रस्टचा कोणताही, कोणत्याही प्रकारे संबंध नाही.

ग्रंथनिर्मितीचा संपूर्ण खर्च सौ. उषा सहस्रबुद्धे यांनी केला असून, त्यातून मिळणारे उत्पन्न सेवाभावी ट्रस्टना देण्याचा संकल्प केला आहे.

या पुस्तकातील मतांशी प्रकाशन मंच सहमत असेलच असे नाही.



**रामदास परंपरा,**
**अयोध्येतील श्रीराम मंदिर**
**आणि**

## कारसेवकांना

॥ जय श्रीराम ॥

# गुज...

**रामदास होऊन प्रकटावे । रामराष्ट्र बुडवे मारावे ।**
**'आनंदवनभुवन' फुलवावे । हाच धर्म ॥**

'राम' तत्त्व म्हणजेच निर्गुण, निराकार, निर्विकार, सार्वकालिक, सर्वव्यापी, अविनाशी, निज, कैवल्य, आद्य, अनंत, श्रीकृष्ण, परब्रह्म, परमात्मा, सच्चिदानंद असे आद्य स्वसंवेद्य आत्मरूप होय. सर्वाभूती हेच 'राम'तत्त्व जीवात्मा रूपाने स्थित आहे. भक्तीने 'राम'तत्त्व ठायीच सिद्ध होते. जीव रामस्वरूप होतो. हाच वेदान्त!

रामस्वरूपाने मानवमात्र सिद्ध झाला की; अवघा मानवमात्र, एव्हढेच नव्हे तर; अवघे भूतमात्र, चराचर अद्वैत भावाने जाणवू लागते. समत्व आणि सामरस्य मनामनात जागते. अवघा व्यवहार सर्वाभूती राम या संवेदनेने रामदासपणाने घडू लागतो. हीच भारतीय जीवनशैली होय! परमेश्वराचा चिद्‌विलास याचसाठी! हेच भारतीयत्व, हीच हिंदू संस्कृती, हाच सनातन मानव धर्म! भूतलावर भारतीय परंपरेने, युगे या 'राम'तत्त्वाचे जागरण, पालन, संरक्षण, वैश्विक कारुण्यभावे केले!

'राम'तत्त्वाचे पूर्ण मानवी अवतार स्वरूप असलेल्या, रघुरामाची, त्याच तत्त्वाचा पूर्णावतार असलेल्या श्रीकृष्णांची, शिवस्वरूप भावनेने भक्ती करून, रामस्वरूप होण्याकरिता साधना करणे म्हणजे रामदास होणे होय. प्रत्येक जण रामदासपणाने ज्ञानवान कर्म करू लागले तर; वैश्विक

रामराष्ट्र प्रकटेल! विश्वच 'आनंदवनभुवन' होईल!

विश्व रामराष्ट्र व्हावे ही, त्या सच्चिदानंद रूपाची, परमात्म्याची अर्थात 'राम'तत्त्वाची इच्छा! वैश्विक रामराष्ट्र प्रकटावे. यासाठी राम दासांची अनादि परंपरा. शिव-शिवा, विष्णु-लक्ष्मी, ब्रह्ममाया, ऋषी, मुनी, तपस्वी अशा वेदोपनिषदे, रामायण, महाभारत, पुराणे, स्मृति रचयित्या ऋषींपासून ही सर्व संत, विचारवंत, तत्त्वज्ञ अशा रामदासांची अनादि परंपरा निस्सीम 'रामभक्ति साधनेने, शिव-शिवा, ब्रह्म-माया, दशावतार, अगणित शक्तीरूपे, ऋषी, नाथ, संत, शास्त्रज्ञ, तत्त्वचिंतक रामस्वरूप होऊन, रामदासपणाने, मनामनातील राम जागविण्याचा खटाटोप करीत राहिले. प्रभू रामचंद्र, भगवान श्रीकृष्ण आणि धर्मराज, छत्रपती शिवराय यांनी वैश्विक रामराष्ट्राचे आराधन केले. आधुनिक काळात अर्थात वर्तमानात, स्वामी विवेकानंद, लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, स्वातंत्र्यवीर सावरकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि यांसारखे अनेक, या परंपरेचे पथिक होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने गत शंभर वर्षे रामदासपण प्रकटविण्यासाठी वैश्विक गुरुकुल उभे केले आहे. अयोध्येतील राममंदिर हे वैश्विक रामराष्ट्राचे बोधचिन्ह होय!

* * *



# रामदासांचे वैश्विक रामराष्ट्र

## (१)

प्रभू रामचंद्रांनी निःस्सीम रामदासांची तपश्चर्या मान्य केली. ९ नोव्हेंबर २०१९ रोजी, भारताचे सरन्यायाधीश रंजन गोगोई यांनी, भारत सरकारला, श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यास, संघटित करून; अयोध्येतील राममंदिराचे बांधकाम करण्याची व्यवस्था करण्याचे आदेश दिले. या न्यासाला विवादित २.७७ एकर जमीन तर देण्यात आलीच; त्याचबरोबर, १९९३ च्या अयोध्या कायद्यानुसार, अधिग्रहित केलेली ६७.७०३ एकर जमीन देण्यात आली. न्यासाचे स्वरूप निश्चित करून देण्यात आले. न्यायासनाच्या निर्णयाने रामराष्ट्रांत अर्थात भारतात आनंदाला उधाण आले. जणू, पुरुषार्थ सिद्धपणाने, जीवनमुक्त झाल्याची अनुभूती, प्रत्येक रामदास घेत होता!

रामदास, पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदींनी, ५ फेब्रुवारी २०२० रोजी, लोकसभेत, न्यासाच्या स्थापनेची घोषणा केली. १९ फेब्रुवारी २०२० रोजी पू. महंत नृत्यगोपालदास यांची न्यासाचे चेअरमन म्हणून नियुक्ती केली. धर्मसंसदेचा आनंद गगनात मावत नव्हता. न्यासाच्या संघटनाम ध्ये, स्वामी गोविंददेव गिरिजी महाराज- खजिनदार, श्री. चम्पतराय- जनरल सेक्रेटरी, श्री. नृपेंद्र मिश्रा- अध्यक्ष, बांधकाम समिती, श्री. के. पारासन- सदस्य, स्वामी वासुदेवानंद सरस्वतीजी महाराज- सदस्य, स्वामी विश्व प्रसन्नतीर्थजी महाराज- सदस्य, युगपुरुष परमानंद गिरिजी महाराज- सदस्य, श्री. विमलेंद्र मोहन प्रताप मिश्र- सदस्य, डॉ. अनिल मिश्र- सदस्य, श्री. कामेश्वर चौपाल- सदस्य, महंत दिनेन्द दासजी-

सदस्य, श्री. ज्ञानेश कुमार – सदस्य, श्री. अवनीश अवस्थी– सदस्य आणि श्री. अनुज झा– सदस्य; अशा एकूण पंधरा रामदासांचा समावेश असल्याचे घोषित झाले.

हजार वर्षांच्या अथक संघर्षानंतर, रामजन्मभूमी आणि श्री रामलल्ला मुक्त झाले. हजार वर्षांचाच हा संघर्ष होता; असे नव्हे. हा संघर्ष अनादि अनंतपणे सुरूच आहे. हा केवळ एका वास्तुसाठीचा संघर्ष नव्हता. वैश्विक रामराष्ट्राच्या उभारणीसाठीचा हा संघर्ष आहे.

## (२)

भारताचा अर्थात विश्वराष्ट्रीयत्वाच्या अर्थात हिंदूराष्ट्राच्या अर्थात वैश्विक रामराष्ट्राच्या, आविष्कारासाठीचा हा संघर्ष आहे. रामजन्मभूमी मुक्ति आंदोलन आणि त्यात मिळालेला न्याय विजय हा, या संघर्षाचे केवळ बोधचिन्ह स्वरूप आहे.

अयोध्येतील राममंदिराच्या निमित्ताने जगभर, प्रचार आणि प्रबोध करणारे रामदास वैश्विक रामराष्ट्र संकल्पना, श्रद्धेने, रामभक्तीने स्पष्ट करीत आहेत – प्रभू रामचंद्र हे सनातन हिंदूधर्मराष्ट्राचे मान स्वरूपातील राष्ट्रपुरुष होत. या राष्ट्रपुरुषाचे अर्थात 'राम'तत्त्वाचे जागरण मनामनात करण्यासाठी प्रत्येक माणसाचा, अर्थात आबालवृद्ध स्त्री–पुरुष यांचा जात, पंथ, धर्म, देश या पलीकडे जाऊन, विश्वात्मक राष्ट्रउभारणीसाठी सहभाग नोंदवायचा आहे. प्रभू रामचंद्र ही केवळ भारतीयांची मिरासदारी नाही; तर 'राम' हे विश्वपुरुष आहेत. या 'राम'तत्त्वाचे जागरण करावयाचे आहे.

## (३)
## 'राम' हेच विश्वचैतन्य तत्त्व

वैश्विक समत्वाने जीवनधारणा करणारे तत्त्व म्हणजे विष्णू तत्त्व होय.



विष्णूंचे चराचर भूतमात्रात असणे म्हणजे, विष्णूस्वरूपाचे, रामस्वरूप भूतमात्रात असणे होय.

**'विष्णू मय जग । वैष्णवांचा धर्म । भेदा भेद भ्रम । अमंगळ ।।**
**कोणाही जीवाचा । न घडो मत्सर । वर्म सर्वेश्वर पूजनाचे ।।'**

या जगद्‌गुरू संत तुकोबारायांच्या उक्तीनुसार, विश्वातील चैतन्यमयी सारसर्वस्व म्हणजे, श्री विष्णू स्वरूपातील सारसर्वस्व अर्थात 'राम' होय. अर्थात जीवनातील 'राम' म्हणजेच, जीवनातील सच्चिदानंदमयता होय. सर्वात्मक कल्याणाचे, मुक्तीचे, कृतार्थतेचे तत्त्व, म्हणजे 'राम' तत्त्व होय. या 'राम' तत्त्वाची सगुणोपासना करणे म्हणजे रामदास होणे. चराचर रामदास व्हावे म्हणजे विश्वरामराष्ट्र प्रकट होईल; ही रामदासांची सनातनविषयक सांगी. 'राम' म्हणजेच अध्यात्म. अध्यात्म हा भारताचा आत्मा आहे, अशी विश्वबंधुत्वाची हाक देणारे स्वामी विवेकानंद म्हणतात, ते याच रामदासपणाने होय.

## (४)
## 'राम' तत्त्व – आगम विचार

रामोपासनेच्या 'अगस्त्य संहिता' या पं. भवनाथ झा संपादित प्राचीनतम आगमशास्त्रात, भगवान विष्णू यांचे तत्त्व 'राम' या तत्त्वाची सर्वोपरता, चवथ्या अध्यायात स्पष्ट केली आहे. शिवपार्वतींच्या आगमविषयक संवादातून ह्या रामोपासनेची सर्वोपरता प्रकट झाली आहे. हिरण्यगर्भ भगवान विष्णू, या देवतेचा सिद्धांत, भगवान शिव, प्रत्यक्ष विष्णू आणि ब्रह्मा यांच्या अद्‌भूत संवादातून प्रकटलेला रामोपासनेचा सिद्धांत पार्वतीमातांना सांगतात.

भगवान शिवपार्वती मातांना सांगतात, ''प्राचीन काळी, सर्व

मुनिश्रेष्ठांसह तीनशे कोटी वर्षे निराहारपणे, अग्नीत राहून; भगवान विष्णुंना समोर ठेवून; ब्रह्मांनी पूजा अर्चना केली. भगवान विष्णू पुण्यवृद्धीसाठी भगवान ब्रह्मा आणि मुनींच्या समोर प्रकट झाले. त्यांचे अलौकिक रूप पाहून सारेच स्तंभित झाले. भगवान ब्रह्मा आणि मुनींनी श्रुति, स्मृति, पुराणांमधील वर्णनांच्या सहाय्याने भगवंतांची स्तुती केली.''

प्रसन्न होऊन भगवान विष्णू म्हणाले, ''मी पूर्ण संतुष्ट झालो आहे. आपणास जे स्थान हवे ते मागा, मी देईन.'' त्यावर भगवान ब्रह्मांनी निवेदन केले. ''भगवन् माझी दास्यता मान्य करा. हे भगवन् पुनर्जन्म फेऱ्यात, कर्म आणि काम क्रोध आदीमुळे, माझी प्रजा दोष युक्त होऊन; दुःख भोगीत आहे. मानवजातीस आणि भक्तांना दोषमुक्त होऊन; जीवनमुक्त होण्यासाठी, आपण उपाय सांगावा.'' स्वर्गातदेखील मिळालेल्या ऐश्वर्याने, दोषपूर्ण अशा इच्छित वस्तुप्राप्त होतात. ही दोषपूर्णता नाहीशी व्हावी. हे ऐकून, भोगदुःख निवारण आणि मोक्षसिद्धी यासाठी, भगवान विष्णूंनी षडाक्षरी मंत्राचा तसेच पंचाक्षर इ. मंत्रांचा उपदेश केला. भगवान ब्रह्मांना त्या मंत्रांचे तात्काळ फळ मिळाले. भगवान ब्रह्मदेव तात्काळ सर्वज्ञ असे, सर्व अस्तित्वाचे स्वामी झाले.

## (५)

'अगस्त्य संहिता' अर्थात प्राचीनतम आगमशास्त्रानुसार 'राम ोपासना'विषयी माहिती ही महर्षी अगस्ति मुनी आणि महर्षी सुतीक्ष्ण यांच्या संवादातून गौतमी, अर्थात गोदावरी तटी, अर्थात खोऱ्यात, सुतीक्ष्णांच्या आश्रमात, महर्षी सुतीक्ष्णांना उपदेश करतांना, महर्षी अगस्ति मुनींनी कथन केली आहे.

महर्षी अगस्ति मुनी सुतीक्ष्णांना म्हणाले, ''भगवान विष्णूंनी सांगितलेल्या मंत्रांचा उपदेश विष्णूंच्या आज्ञेने ब्रह्मदेवांनी सर्व ऋषीमुनींना केला. भगवान विष्णूंनी आज्ञापूर्वक सांगितले की, हे ब्रह्मा आपण या मंत्राचे ज्ञाता तथा द्रष्टे आहात, स्वतः विष्णू अर्थात राम या मंत्राची देवता आहे तसेच सर्वश्रेष्ठ असा गायत्री छंद हा या मंत्राचा छंद आहे.''

महर्षी अगस्ति मुनींनी 'राम' तत्त्व प्रकट करणाऱ्या मंत्राचे रहस्य सुतीक्ष्णांना उलगडून सांगितले. महर्षी अगस्ति मुनी म्हणाले, ''विष्णू भगवंतांनी सांगितले की, मकार (राम्) तथा यकार (रामाय) यांनी शेवट होणारा असा बीज मंत्र आहे. नमः ही या मंत्राची शक्ती आहे. ॐकार कामबीज, मातृकाक्षर आहे. यापुढे, क्रमाने मंत्र प्रकट होतो. 'ॐ रामाय नमः' मंत्राच्या मध्यावर 'रामाय' हे पद राहील आणि 'राम' या तत्त्वालाच मंत्र निवेदित होईल.

या मंत्राच्या योगाने संसारातील दुःखभोग तर नाहिसे होतीलच; त्याचबरोबर देहांत होताच मोक्ष प्राप्त होईल. ब्रह्मदेवांनी 'राम' मंत्राचा विस्तार करून; त्याचे महत्त्व जगातील सर्व शिष्यांना सांगावे असे विष्णूभगवंतांनी सांगून, विष्णू भगवंत अंतर्धान पावले.''

## (६)

महर्षी अगस्ति मुनींनी सुतीक्ष्णांना हा वृत्तांत सांगितला आणि म्हणाले, ''भगवान शिवांनी पार्वती मातांना, ब्रह्मदेव हेच 'राम' मंत्राचे उपदेशक असल्याचे कथन केले. त्या दिवसापासून, पार्वतीमाता, श्री रामांत एकाग्रचित्त होऊन; आपल्या हृदयात रामतत्त्वाची स्थापना करून; मोक्ष मुक्तीसाठी मन स्वरूपसिद्ध करू लागल्या. या 'राम' सिद्धांतालाच हिरण्यगर्भ सिद्धांत म्हणतात. हा सिद्धांत भगवान शिवांनी, केवल ज्ञानाची इच्छा ठेवणाऱ्या, पार्वतीमातांना सांगितला.'' महर्षी अगस्ति मुनी सुतीक्ष्णांना शिवपार्वती संवाद रहस्य सांगू लागले.

भगवान शिव पार्वतींना म्हणाले, ''हे कल्याणी, जगाची पुनरुत्पत्ती करण्यासाठी, आपण दोघे, शेवटी जगतातील चराचराला सांभाळण्याची जबाबदारी टाकून देतो. त्यामुळे हे जगत नष्ट होते. परंतु सर्वच चराचराचा

नाश होऊन चालत नाही. जग पुढे चालू राहावयास हवे. आपणा दोघांच्या मागे आणि पुढेही कोणीच नाही. अशा अभावामुळे कार्य कसे होणार? आपणा उभयतांच्या अस्तित्वामुळे तर देवतांचीही उत्पत्ती होते. हे देवी तूच जगत्‌जननी आहेस. तुझ्या कृपेनेच तर हे सर्व जग कधीही समाप्त होत नाही. त्यामुळे तू मोक्षाचा विचार करणे योग्य नाही.'' त्यावर माता पार्वती म्हणाल्या, ''मला अनुग्रहपूर्वक योग्य ते काय करावे हे सांगावे.'' महादेव म्हणाले, ''प्रतिदिन 'श्रीराम' आराधना करावी. पूजा सामग्री घेऊन; अर्थात तन, मन, धन पूर्वक आराधना केल्याने; परलोकासाठी अभय प्राप्त होईल. कलियुगात नामसंकीर्तन, पूजा, अर्चा यांनीच पाप नष्ट होते. मोक्ष प्राप्ती मिळते. गृहस्थ माणसाला इहलोक आणि परलोक यांत मांगल्य सांधण्यासाठी 'राम' भक्ती हाच उपाय आहे. यासाठी सामग्रीसह मनःपूर्वक रात्रंदिवस श्रीरामाराधना करावी. जो आपल्या ठायीच्या 'राम'तत्त्वाला ओळखून विहार करतो; त्याला कोणतेही कार्य दुष्कर राहात नाही. राम पूजनार्थ तुलसीदल अधिक ग्राह्य असते, असे तुलसीदलाचे महात्म्य आहे.''

## (७)

शिवपार्वती संवादातील 'राम' पूजनाचे महात्म्य ऐकून सुतीक्ष्णांनी महर्षी अगस्ति मुनींना ब्रह्मदेवांनी सांगितलेले मंत्ररहस्य सांगण्याची विनंती केली. महर्षी अगस्ति कथा सांगू लागले, ''शिव नगरी काशीत ब्रह्मदेवांचे आगमन झाले. महादेवांनी त्यांची विचारपूस केली. नंतर शिवांनी ब्रह्मदेवांकडे आपल्या अनन्य भक्तासाठीचा मोक्षमार्ग सांगण्याची विनंती केली तेव्हा ब्रह्मदेवांनी 'राम' भक्तीखेरीज दुसरा उपाय मला माहीत नाही. तसेच 'राम' भक्तीचा उपाय, स्वतः विष्णूंनीच सांगितला आहे असे सांगितले. महादेवांनी पुन्हा 'राम'भक्तीचा उपाय उलगडून सांगण्याची विनंती केल्यावर ब्रह्मदेवांनी, प्रभूविष्णूंनी सांगितलेले 'राम' रहस्य कथन केले.

सुतीक्ष्णांनी महर्षी अगस्ति मुनींना 'राम' मंत्र जप परंपरेविषयी कुतुहलाने विचारले. महर्षी अगस्ति मुनी म्हणाले, ''भगवान शिवांनी माता पार्वतींना सांगितले; ब्रह्मा सृष्टी निर्माण करतात, विष्णू पालन करतात आणि शिव संहार करतात. या सृष्टीचक्रात एकच तत्त्व परब्रह्म आहे त्याखेरीज दुसरे काहीच नाही. समग्र विश्व सत्यस्वरूप आहे आणि तेच ज्ञान आहे. परब्रह्मच विश्वाच्या रूपाने दृश्यमान होते. हे विश्वपालन ब्रह्मा विष्णू महेश रूपाने, ते परब्रह्मच करीत असते. विश्वपालन करणारे तत्त्व विष्णूतत्त्व आहे. तेच तत्त्व परब्रह्मस्वरूप आहे. ब्रह्मा आणि शिव याच तत्त्वाचे ध्यान, जप आदि करून सृष्टीपालनात सहभागी होतात. ते परब्रह्म तत्त्वच या विश्वरूपाने 'रम-राम' तत्त्व अस्तित्वात असते. विश्वपालनात, त्याच 'राम' तत्त्वाचे चिंतन, हाच एकमेव, सर्व कल्याणाचा उपाय आहे. या 'राम' तत्त्वाच्या अखंड चिंतनाने भवभोग निवारण आणि मोक्षसाधना होते; हे प्रत्यक्ष भगवान परब्रह्मस्वरूप विष्णूंनी भगवान ब्रह्मांना सांगितले. पुन्हा पुन्हा सृष्टीउद्‌भवासाठी संहार कार्य माझ्याकडे असले; तरी संहारातूनच पुनर्जन्म; हे भगवान ब्रह्माचे कार्य सुरू होते. या कारणाने या परब्रह्म तत्त्वाचे ज्ञान मुळातच भगवान शिवांना आणि प्रकृतीस्वरूपिणी पार्वतीला आहे; असे शिवांनी सांगितले. म्हणूनच शिव आणि पार्वती हे युगुल रामदासपणाने प्रकट असते. ते सतत 'राम' तत्त्वाचे चिंतन करते. सृष्टीकल्याण आणि सृष्टीधारणेसाठी शिवपार्वती 'राम' तत्त्वातच अद्वैत असतात.''

सुतीक्ष्णांनी आणखी कुतुहलाने विचारले, ''हे महर्षी अगस्ति आपण अतिप्राचीन आहात, भगवान विष्णूंनी 'राम' तत्त्वाचा उपदेश ब्रह्मदेवांना केला; हे शिवांनी पार्वतीला सांगितले. शिवांप्रमाणे ब्रह्माही सृष्टीउत्पत्तीचे कारण आहेत. त्यांना तर हे 'राम' तत्त्व शिवांप्रमाणे ब्रह्मालाही ज्ञातच असणार, मग या लीलेचा अर्थ काय?'

महर्षी अगस्ति मुनी म्हणाले, ''ब्रह्मांना हे तत्त्व अवगत होते म्हणूनच

तर या विष्णूतत्त्वाची अर्थात 'राम' तत्त्वाची त्यांनी ब्रह्ममानसपुत्रांना सवे घेऊन; तपश्चर्या केली. सृष्टीतील भवभोग दुःखावरील आणि मोक्षप्राप्ती करीताचा उपाय विचारला. मी आपणास त्याविषयी कथा सांगितली आहे. हे मुने आपण विचारल्याप्रमाणे मी आता रामदासांची अर्थात रामोपासना करणारांची परंपरा गुरुपरंपरेने सांगतो.''

## (८)

महर्षी अगस्ति मुनी म्हणाले, ''ब्रह्मदेवांनी, ब्रह्म मानस पुत्र मनु ऋषींना आणि वसिष्ठासह सर्व ऋषींना, भगवान विष्णूंच्या आज्ञेप्रमाणे, 'राम' तत्त्वाचा उपदेश केला. 'राम' तत्त्वाच्या उपदेशाची परंपरा गुरुपरंपरेने वेदव्यासांपर्यंत चालत आली. वेदव्यासांच्या मुखाने 'राम' मंत्र पृथ्वीवर श्रीमद् भगवद्गीता आणि श्रीमद् भागवत पुराण यांच्या माध्यमातून फैलावला. महान तेजस्वी वेदव्यासांनी आपल्या शिष्यांना या मंत्राचा उपदेश केला. वेदव्यासांनी या मंत्राचा उपदेश प्रथम शौनक मुनींना केला. हा उपदेश करतांना गुरुशिष्य कसे असावेत याविषयी गुणांची चर्चा करून; हा उपदेश केला. 'राम' मंत्राचा उपदेश करून मंत्र, यंत्र, तंत्र या सर्व प्रकारे 'राम' तत्त्व जागरणाचा उपाय सांगितला. विधिविधाने सांगितली. ब्रह्मदेवांपासूनची ही परंपरा वेदोपनिषदे, पुराणे या प्रवाहाने कलियुगापर्यंत सुरू आहे. या उपायांनी श्रीराम अर्थात भगवान विष्णू प्रसन्न होऊन दुःखहरण करतात आणि मोक्ष मार्ग दाखवितात. प्रथम प्रणव तथा ॐकार आणि शेवटी नमः यांनी युक्त असा मंत्र प्रमाण मानला जातो. ''वेदव्यासांनी आणि पुढे शौनक मुनींनी मंत्र, तंत्र, यंत्र यांची व्याप्ती वाल्मिकी, हनुमान आणि मी अशा अनेकांनी लिहिलेल्या रामायणातील प्रभू रामचंद्र यांच्यासह सर्व विभूतिमत्त्वांच्या संदर्भाने विकसित केली. न्यासपूर्वक अनुष्ठाने करण्याचेही मार्गदर्शन केले. तसेच या परंपरेत ऋषींनी मंत्र, तंत्र, यंत्र अर्थात कवच यांचे ज्ञान करून



दिले आहे.'' महर्षींनी सुतीक्ष्णांना संपूर्ण प्राचीनतम आगम शास्त्रानुसार रामोपासना कथन केली.

## (९)

महर्षी सुतीक्ष्णांनी या सर्व रामोपासनेचा कलियुगात विश्वातील सर्वसामान्य माणसांसाठी सर्वदुःखहरणार्थ उपाय विचारला. तेव्हा महर्षी अगस्ति मुनींनी 'राम' बीजमंत्राचा वैश्विक मानवाच्या सर्वकल्याणाचा उपाय म्हणजे 'राम' मंत्र होय असे सांगितले. विश्वातील अवघा मानव हा 'राम' तत्त्वाने एकात्म झाला की तो स्वतःसह चराचराच्या कल्याणासाठी प्रवृत्त होतो. विश्वातील हा 'राम' तत्त्वाचा संचार सच्चिदानंदस्वरूप विश्वरूपाचे दर्शन घडवून; विश्वाच्या अंतापर्यंत अर्थात प्रलयापर्यंत सुखाने नांदतो व प्रलय काली पुन्हा सत्ययुगात प्रवेश करतो हे समजावून सांगितले.

महर्षी सुतीक्ष्णांनी सगुण साकार चराचराच्या अस्तित्वामधील 'राम' तत्त्वाचे महत्त्व महर्षी अगस्ति मुनींना समजावून सांगण्याची विनंती केली. महर्षी अगस्ति मुनींनी महर्षी सुतीक्ष्णांची चराचराविषयीच्या कारुण्यपुर्ण मनोस्थितीची प्रशंसा केली.

चराचर सगुण विश्व सत्व, रज, तम गुणांनी एकत्र आहे. हे तीनही गुण मुळात परब्रह्माच्या स्वसंवेद्यते ठायी असून; त्यांचे प्रतिनिधित्व त्रिविध रूपाने, पुरुष व प्रकृती यांच्या स्वरूपात, शिव-पार्वती, विष्णू-लक्ष्मी, ब्रह्म-माया हे करीत आहेत. हे तीनही गुण या त्रिविध रूपांत धारण करून; सगुण रूपात आविष्कार करण्याची परंपरा आहे. या तीन गुणांमुळे सृष्टीत संघर्षात्मलीला घडत असते. अशा संघर्षात्मक लीलेत रज आणि तमो गुणांचा अतिरेक झाला की सृष्टीधारणा धर्मातील सच्चिदानंदरूप लीला बाधित होते. संघर्ष विनाशकारी होऊ लागतो. म्हणजे तमोगुणाचा अतिरेक होतो. सृष्टीसंघर्ष सृष्टीव्यवस्थापनासाठी

आवश्यक असतो. तो संघर्षदेखील सत्व, रज, तम अशा तीनही गुणांच्या संदर्भाने होतो. अशावेळी रज आणि तम गुणांचे निराकरण करण्यासाठी किंवा त्यांना प्रभावशून्य करण्यासाठी; सत्त्वगुणाचा प्रकर्ष व्हावा लागतो. धारणातत्त्व हे कैवल्य लीलेकरिता सत्त्वगुणाच्या अधिक्याने आविष्कृत असते. तेच चराचराच्या आत्मतत्त्वाचे सच्चिदानंदस्वरूप प्रकट करते. जीवात्मा याच तत्त्वाच्या साहाय्याने जीवनमुक्तीची अनुभूती घेतो. हे धारणातत्त्व म्हणजे चराचराच्या ठायीचे 'राम' तत्त्व अर्थात विष्णूतत्त्व होय.

## (१०)

चराचरातल्या 'राम' तत्त्वाचा जागर होणे हाच भगवान विष्णूंचा अवतार होय. म्हणूनच सृष्टीविहितेची धारणा लीला; अर्थात धर्म, तमोगुणांच्या अतिरेकाने किंवा रजोगुणाच्या व तमोगुणाच्या अहंकाराने बाधित झाला की; परब्रह्माची, रामतत्त्वलीला अवतार रूपाने घडते. भगवान विष्णूंचे अवतार हे याच 'राम' तत्त्वाचे अवतार होत. प्रलयापर्यंतच्या प्रवासात असे अनेक अवतार 'राम' तत्त्वाला घ्यावे लागतात.

महर्षी अगस्ति मुनी हे 'राम' तत्त्व आविष्कार लीला स्वरूप, समजावून सांगत असतांना सुतीक्ष्णांनी कुतुहलाने विचारले, ''दाशरथी राम हे असा 'राम' तत्त्वाचा आविष्कार आहेत होय ना?'' प्रश्न ऐकून महर्षी अगस्ति मुनी हसले. ते म्हणाले, ''होय मत्स्य, कत्स्य, वराह, वामन, नारसिंह, परशुरामादि अवताराप्रमाणे दाशरथी राम हेही अवतार आहेत. मात्र अन्य अवतारात आणि प्रभू राम अवतार यांत अंतर आहे, ते म्हणजे 'राम' तत्त्वाचे पूर्ण मानवी अवतार म्हणजे दाशरथी रामचंद्र होत. म्हणूनच प्रभू रामचंद्रांच्या भक्तीने, मानवाचे सर्वथा कल्याण होते. मानवाच्या मनातील 'राम' तत्त्व सहज जागृत होऊन; सर्वकल्याणार्थ जीवनव्यवहार होऊ लागतो. म्हणूनच ब्रह्मर्षी नारदांनी वाल्याकोळी याला ह्या रामतत्त्वाची उपासना सांगितली. शिवांनी स्वतः हनुमानस्वरूप अवतार स्वीकारून प्रभू रामचंद्रांचे राष्ट्र उभारण्याचे लीला सहाय्य केले. शिव, नारद, हनुमान यांनी आणि मी स्वतः प्रभू रामांचे 'रामायण' अर्थात रामयुगाचे वर्णन करून ठेवले, तर वाल्मिकींनी उपासनेने ऋषीत्व संपादन करून; 'रामायण' हा ग्रंथ लिहिला. वेदोव्यासांनी प्रत्यक्ष कैवल्य अवतार, भगवान श्रीकृष्णांच्या सहाय्याने 'राम' तत्त्वाचे जागरण करून; तत्त्वाचा अर्थात वैष्णव उपासनेचा प्रसार केला. नवनारायणांनी नाथअवतार घेऊन; 'राम' तत्त्वाचे जागरण केले. शिवांनी अष्टभैरवादी अवतार घेऊन; 'राम' तत्त्व जागरणाला सहाय्य केले. महामाया, महाकाली, महाशक्ती, महासरस्वती, महालक्ष्मी आदि शक्तिरूपांनी 'राम' तत्त्वाचे जागरण करण्यासाठी शिवांना सहाय्य केले. ब्रह्मदेवांनी वाङ्मयकला विद्या यांच्या सहाय्याने या तत्त्वाचा व साधनेचा प्रचारप्रसार सर्व देवदेवतांच्या सहाय्याने केला.'' महर्षी अगस्ति मुनींनी रामदास परंपरेचा थेट कलियुगापर्यंतचा प्रवास सुतीक्ष्णांना सांगितला.

## (११)

महर्षी सुतीक्ष्ण म्हणाले, ''त्रिकालज्ञ, शिवस्वरूप महर्षी अगस्ति मुनी 'राम' भक्तीचे आणि 'राम' तत्त्वाचे रहस्य मला कळले. मी धन्य झालो. महाप्रलयापर्यंत 'राम' तत्त्व पुन्हा पुन्हा अवतारित राहणार काय? महर्षींच्या प्रश्नाने प्रसन्न झालेले भगवान महर्षी अगस्ति मुनी म्हणाले, 'राम तत्त्व' म्हणजेच परब्रह्मतत्त्व होय. परब्रह्माचा 'राम' स्वरूप आविष्कार, परब्रह्माच्या सृष्टीलीलेच्या अखेरीपर्यंत म्हणजे चवदा चतुर्युगांतून सुरूच असणार आहे. म्हणूनच सृष्टीतील चराचर भूतमात्रांच्या अक्षय कल्याणासाठी 'राम' तत्त्वाचे जागरण मनामनात होणे आवश्यक आहे. विश्वाच्या मानवी एकात्म जीवनाचा हाच खरा मार्ग

आहे. माणसाच्या मनात 'राम' तत्त्व जागरणाने, व्यष्टीपासून समष्टीपर्यंत, अखिल मानवजात धर्माचरणाने जीवनमुक्त अवस्था ठायीच अनुभवेल. मात्र वैश्विक मानव जातीत 'राम' तत्त्व जागणे त्यासाठी अनिवार्य आहे. शिव आणि ब्रह्मामानसपुत्र तथा समस्त देव, देवता रामदासपणाने त्यासाठी विविध रूपांनी सहाय्य करीत आहेत. आपले हेच ब्रह्मकर्म होय.

## (१२)

## श्रीमद् आद्य शंकराचार्यांचे रामदास्यत्व जागरणाचे प्रयत्न

विश्वात राजस आणि तामस अहंकाराने उद्धट झालेल्या शक्तींनी तथाकथित सोयीस्कर उपासना पंथांना, धर्म नावाने प्रसिद्ध करून; साम्राज्यवादी भूमिकेने, जगताचा स्वार्थलोलूप भोग घेण्याचा, अश्लाघ्य प्रयत्न सुरू केल्यामुळे; पूज्यपाद भगवान शंकराचार्यांचे प्राकट्य झाले. भगवान शिवांनी, जणू पूज्यपाद आचार्यांना भगवान शिवांचे आणि माता पार्वतींचे, आराध्य भगवान विष्णूंचे, अर्थात सात्त्विक भावाचे जागरण करण्याची आज्ञा केली. 'राम' तत्त्वाचे आणि रामवृत्तीचे विश्वात जागरण करण्याची ही आज्ञा शिरोधार्य मानून; 'राम' तत्त्व प्राकट्याची गंगोत्री अशी भारतमाता, डोळ्यासमोर ठेवून; रामराष्ट्र उभे करण्यासाठी श्रीमद् शंकराचार्यांनी रामदासपण अंगिकारले.

## (१३)

अवघ्या तिशी-चाळीशीच्या दशकात त्यांनी रामदासवृत्तीने भ्रमंती करीत; शिवतत्त्वाने दिलेली 'राम' तत्त्व जागरणाची आज्ञा, बारा ज्योतिर्लिंगे आणि अनेक ज्योतिर्लिंग समस्थाने, अधिकारवाणीने घोषित केली. या शिवतत्त्वांना चहू दिशांनी 'राम' मंत्राचे अर्थात 'राम कृष्ण हरि, राधेकृष्ण गोपाळकृष्ण, विष्णवेनमो विष्णवो नमः' आदि मंत्रांनी 'राम' तत्त्वाशी जोडले.

धर्माचे अर्थात राम तत्त्वाचे, चहू दिशा चार धाम घोषित केले. शिव विष्णू अद्वैताची पेठ फुलविली. बदरीविशालधाम, द्वारकाधाम, जगन्नाथपुरीधाम, रामेश्वरधाम अशी वैकुंठप्राप्तीची चारधाम यात्रा परंपरा सुरू केली. रामराष्ट्राचे जागरण करण्यासाठी ऋषी, मुनी, साधू, संत, संन्यासी यांची शृंखला निर्माण केली. शिवशक्ती आणि रामशक्ती यांच्या अद्वैत भावाने, जीवात्मा परमात्मा, शिवशक्ती, विष्णुलक्ष्मी, ब्रह्ममाया यांच्या आणि सर्वाभूती परमेश्वराची, अर्थात 'राम'तत्त्वाचे शिवरूपत्व जागवून; शिव-वैष्णव भक्ती असे रामदासपण जागवले. स्वतःबरोबर सर्वांना, वैश्विक रामराष्ट्राचे पायिक, म्हणून संस्कारित केले. दशनाम आखाड्यातून, वैश्विक रामराष्ट्राची पुनर्स्थापना केली.

भ्रमंती करतांना गंगा, यमुना, सरस्वती, सिंधु या उत्तरेकडील पवित्र जलस्त्रोतांचे 'राम' तत्त्वीय महत्त्व घोषित केले. तसेच गोदा, कावेरी या दक्षिणेकडील जलस्त्रोतांचे 'राम' तत्त्वीय महत्त्व घोषित केले. 'राम' तत्त्वाच्या अमृतकुंभांच्या तीर्थात पावन होऊन; 'राम' तत्त्वाचे जागरण करण्यासाठी; पवित्र प्राचीन परंपरांना कुंभमेळ्याचे स्वरूप देऊन; विश्वातील विष्णूदासांना, शिवस्वरूपांना शाक्त, गाणपत्य आदि पंथोपपंथांना, कुंभमेळ्यात 'राम'तत्त्वी रमविले.

ठायी ठायीच्या तीर्थांना व्यवस्थापनाच्या दृष्टीने अर्धकुंभमेळ्याचे स्वरूप घोषित करून अवघी भारतमाता सात्त्विक भावाने भारून टाकली.

## (१४)

प्रभू रामचंद्रांची अयोध्या आणि शरयू, धर्मयुद्ध घडविणारे कुरुक्षेत्र, महायोगपीठ सरस्वती चंद्रभागा असे श्रीगोंदा-पंढरपूर क्षेत्र आणि स्वतः चे धर्मपीठ कांचीपूरम अशी अनेक तीर्थक्षेत्रे पूज्यपाद शंकराचार्यांनी रामदासपणाने जागविली.

उत्तर दक्षिण दिशांना आपल्या पावित्र्याने अद्वैताचा अनुभव देणारी नर्मदा शिव-विष्णू ऐक्याची आदर्श म्हणून मनामनात जागविली.

शक्तींची, सृष्टी उत्पत्ती, स्थिती आणि लय घडविणारी रूपे, ब्रह्मा, विष्णू, महेशांच्या, रामलीला विश्वात घडविण्यासाठी सिद्ध झाली आहेत; हा इतिहास जागविला.

वेद, उपनिषदे, पुराणे असे प्राचीनतम वाङ्‌मय, शैव, शाक्त, सूर्य, गाणपत्य आणि पांचरात्र अर्थात वैष्णव आणि त्यातून निर्माण झालेले नाथ, दत्त आदि सर्व पंथ मार्ग एकाच 'राम'तत्त्वाचे जागरण करीत आहेत; हे आपल्या रचनांमधून सर्वामुखी केले. महाराष्ट्रातील लोकदैवत हरि तथा विठ्ठल हेच परब्रह्मलिंग होय. तेच राम कृष्ण हरि स्वरूपाने सर्वत्र भरून आहे, असे 'महा योग पीठे... परब्रह्म लिंगम भजे पांडुरंगम्' असे घोषित करून; 'राम'तत्त्वाची अध्यात्मिक राजधानी घोषित केली.

स्वतःच्या निवासस्थानी; शिवकांची, विष्णूकांची अशी शिवविष्णू अद्वैताची नगरी प्रकटविली.

द्वैत भावाने दूर आणि पृथकपणे विचार करणाऱ्या अध्यात्म विचारांना, आगमशास्त्राधारे द्वैतभाव हा 'राम' तत्त्व या अद्वैत भावाकडे 'सत्य, प्रेम, करुणा' या मार्गाने नेतो असे पटवून देऊन; विश्व रामराष्ट्र उभारण्यासाठी सिद्ध केले.

पूज्यपाद शंकराचार्यांच्या अखंड रामदासी वृत्तीने ज्ञानात्मक कर्मशीलतेने, अर्थात वैराग्यपूर्ण ईह विचाराने; वैश्विक रामराष्ट्रभूमी भारतमाता, अखंड रूपात एकात्म भावाने प्रकट करण्यासाठी, साधूसंत संन्यासी, राज्यकर्ते तथा शास्ते आणि सर्वसामान्य जनता कार्यरत झाली.

शिवस्वरूप शंकराचार्यांनी, अशा सर्व प्रकारचे कलियुगाच्या ठायी रामोपासना केली. शिवांचे रामदासस्वरूप शंकराचार्यांच्या रूपाने प्रकटले. हा प्रवास ही, दिव्य अशी राम कृष्ण हरि लीला होती, असेच म्हणावे लागते.



## (१५)
## सर्व देव नमस्कारं केशवं (रामं) प्रतिगच्छति

श्रुति, स्मृति, पुराणांच्या आणि दर्शनांच्या मार्गाने, परब्रह्म स्वरूपाचे नाव, राम, कृष्ण, हरि, विठ्ठल, पांडुरंग, बालाजी, केशव इ.इ. विष्णूसहस्त्र नामांप्रमाणे कोणत्याही नावाने ते एकच रामतत्त्व संवेदित होते; असा निर्वाळा वेदांताने दिला. सर्वरूपांचे अद्वैत त्या एकाच तत्त्वात सामावलेले आहे, हे लक्षात आल्याने, सर्व पंथोपपंथांनी आपल्या आराध्याला त्या एकाच तत्त्वात अनुभवता येते, असे एकप्रकारे मान्य केले. उदा. गाणपत्य संप्रदायाने गणपती अथर्वशीर्षामध्ये, त्याच विष्णूतत्त्वाची उपासना करीत असल्याचा भाव जागविला. सूर्योपासकांनी सूर्यवंशाला अर्थात इक्ष्वाकू वंशाच्या प्रभू रामचंद्रांचीच उपासना सुरू केली. शिवशक्ति संप्रदायांनी तर विष्णूतत्त्वाला उपास्य मानले. हनुमान, अष्टभैरव यांचे सत्वभावाला सहाय्य आणि संरक्षण देण्याची परंपरा, कथात्मकतेने सुरू झाली. अशा सर्व संप्रदायाला आचार, विधिनिषेध, मंत्रतंत्रयंत्र, विधिविधाने वेगळी असूनही; निर्गुण, निराकार, निर्विकार, सर्वव्यापी, अविनाशी, महाशून्य, अनंत, कैवल्य, निज, आद्य, स्वसंवेद्य, आत्मरूप हेच कृष्णतत्त्व अर्थात 'राम'तत्त्व होय, हे स्पष्ट आहे. आराध्यांच्या उपासनेमुळे हेच 'तत्त्व' विश्वोत्पत्तीस कारण असे; सत्‌चिदानंद रूप अस्तित्वात आहे, हेच तत्त्व सृष्टीरूपात रमले आहे; म्हणून हेच स्वसंवेद्य चैतन्यतत्त्व, म्हणजेच 'राम' तत्त्व होय याविषयीचे द्वंद्व लयाला गेले. वैष्णव उपासनेत सर्व उपासना एकवटल्या. त्यामुळे विश्वातील चैतन्यतत्त्व अर्थात सत्, चिद्, आनंद या जाणिवा म्हणजेच 'राम'तत्त्व होय. 'राम'तत्त्वातच विश्वाची एकात्मता एकवटली असल्याने अवघे उपासक रामदास वृत्तीने रामतत्त्वाची उपासना करीत आहेत.

## (१६)
## रामदासांची वैश्विक रामराष्ट्राची भावना

राष्ट्र या संकल्पनेत समूहमनाची भावनात्मक एकात्मता तीव्र झालेली असते. समूहमन, समुहाच्या सर्वकल्याणाचा विचार करते. 'राम'तत्त्व उपासनेने, भक्ति, मति, शक्ती, एकवटून सर्वाभूतीच्या सत्य अस्तित्वाविषयीच्या, प्रेममयतेने सर्वाभूतीचा कारुण्यभाव निर्माण होतो. असा भाव निर्माण होणे; म्हणजेच 'राम' तत्त्व जागणे होय. सर्वांच्या त्रितापांचे सर्वांच्या सहाय्याने निवारण करणारे, ज्ञानवान कर्म घडणे, अखिल मानव जातीच्या न्याय्य जीवन संवेदनांचे रक्षण करणारे कर्म घडणे, हे अभिप्रेत असते. सर्वांच्या ठायी असे 'राम' तत्त्व जागणे, म्हणजे अर्थपूर्णता जागणे होय. म्हणूनच मनात 'राम' नसेल तर जीवन निरर्थक होय; असे म्हटले जाते. रामदासांना सर्वांभूति 'राम' असलेले वैश्विक एकात्म जीवन, अनुभवण्याची आस आहे. त्याकरिता रामदासांना वैश्विक रामराष्ट्र भावना जोपासण्याची अपेक्षा आहे. वेदोपनिषदे, पुराणे यांनी जागविलेली ही वैष्णव भावना, अर्थात सच्चिदानंद स्वरूप भावना, अर्थात 'राम' तत्त्वाशी अद्वैत भावना जागविण्यासाठी अवघे लोक रामदास व्हावेत असे वाटते.

## (१७)

विश्वातील प्रत्येक माणसाच्या ठायी राम आहे अशी संवेद्यता प्रत्येकाचे ठायी निर्माण व्हावी. समदृष्टीने सर्वांना न्याय मार्गाने, जीवनासाठीच्या सर्व ऐहिक आणि पारलौकिक गरजा पूर्ण करता येतील; असे समूहमन अर्थात 'राम राष्ट्र' मन तयार व्हावे. संघर्ष हा जीवनाचा आत्मा आहे. प्रत्येक गोष्ट प्राप्त करण्यासाठी, झगडावेच लागते. हा संघर्ष वैश्विक मानवाने संघमनाने समजून घेऊन; वर्तन करण्यास प्रवृत्त व्हावे. माणसाचे जीवन सर्व जीवमात्रांवर अर्थात तृण वनस्पती आणि चर जीव यांच्यावर अवलंबून असते. तसेच पंचमहाभूतांच्या वर अवलंबून असते. त्यासाठी विश्वात्मक 'राम' विचाराने सर्वांना, या सर्व अवलंबित्वाचा, समदृष्टीने, प्रकृती न्यायाने उपभोग घेता यावा; अशी जीवनसारणी अवलंबिण्याचा विचार करावा. कोणाही एकट्या व्यक्तीला किंवा विशिष्ट मानवी समूहाला, ऐहिक स्वार्थप्रेरित, स्वार्थांध होऊ देता कामा नये; यासाठी सर्वाभूती 'राम' या कारुण्यभावाने, संघर्ष साधना, अशी पुरुषार्थपूर्ण वर्तन घडविणारी नीती व्यवस्था असावी. अशी रामदासांच्या वैश्विक रामराष्ट्राची भावना आहे.

सामंजस्य, सहिष्णुता, समदृष्टी, प्रेम, सत्यनिष्ठा आणि करुणापूर्ण दृष्टीने माणसा-माणसातील संबंध कुटुंबापासून विश्वात्मक मानवी संघापर्यंत प्रकटावेत अशी मानवी जीवनशैली असावी, हे रामदासांच्या विश्वरामराष्ट्राचे अधिष्ठान आहे.

## (१८)

मानवी परंपरेतील इक्ष्वाकु वंशाने अर्थात रघुवंशाने वंशपरंपरेने, ऋषींनी दाखविलेल्या वेदांतमार्गाने, लोकनिष्ठ अध्यात्म भावनेने हे अधिष्ठान सांभाळले आहे. प्रभू रामचंद्र यांचा जीवनव्यवहार, हा या अधिष्ठानाचा आदर्श जीवनव्यवहार आहे. 'राम'तत्त्वाचा मानवी जीवनशैलीतील परिपूर्ण आविष्कार मर्यादापुरुषोत्तम प्रभू रामचंद्रांमध्ये; 'राम' तत्त्वाच्या, मानवी अवतार स्वरूपात पाहावयास मिळतो. देव, दानव, मानव आणि कुंजर, वानर, किंपुरुष या सर्व मानवी समूहांनी, हे मान्य केल्याचा इतिहास, महर्षी वाल्मिकींनी; शिवपार्वती कथित विष्णूलक्ष्मी निवेदित ब्रह्मर्षी नारद, रामदासश्रेष्ठ हनुमान आणि महर्षी अगस्त्य या सर्वांनी मांडलेल्या रामायणाच्या आधारे, प्रत्यक्षदर्शित्वाने लिहिला.

या प्राचीनतम इतिहासाच्या साक्षीने, दाशरथी प्रभू रामचंद्र हे वैश्विक रामराष्ट्राचे विश्वराष्ट्रपुरुष म्हणून, प्रकटल्याचे जाणवते. अध्यात्म आणि जीवनव्यवहार, या दोन्ही गोष्टी या विश्वराष्ट्रपुरुषात, अद्वैताने प्रतीत होतात. द्रष्ट्या ऋषींच्या प्रज्ञेला जाणवलेले हे सत्य, शिवशक्ती, ब्रह्ममाया, विष्णूलक्ष्मी या प्रकृतीपुरुषस्वरूप युगुलांनी, मानवांसाठी प्रेरित केले. अध्यात्माचे सगुण साकार असे मानवी रूप 'राम' रूपाने प्रकटले. रामदासांच्या हृदयीचे आत्मतत्त्व प्रभू रामचंद्रांच्या रूपाने प्रकटले.

या रामरूपात, रामदास वृत्तीने कार्यरत होऊन; विश्वकल्याण साधता येईल याची प्रतीती रामचरित्रातून येते.

## (१९)

विश्वरामराष्ट्राचे ध्येय उराशी बाळगून, 'राम'युक्त, रामस्वरूप होण्यासाठी, भगवान शिवांनी आरंभिलेल्या तपश्चर्येचा, अध्यात्मिक आणि जीवनव्यवहारातील मार्ग, रामभक्तीने प्रशस्त होतो. यासाठी पंथोपपंथातील सत्यनिष्ठांनी 'राम'तत्त्वाचा स्वीकार करून; अध्यात्म साधना सुरू केली,

दशावतारांची सहस्त्रनामे; सहस्त्र अर्थात अगणित रूपे, 'राम' तत्त्वाची आणि प्रभू रामचंद्राची प्रतिरूपे मनामनात प्रकटली. ती ठायी ठायी प्रस्थापित झाली. राम, कृष्ण, हरि, श्री बालाजी, पांडुरंग, विठ्ठल, चतुर्भुज विष्णू ही भारतवर्षातील ठायीठायीची सगुण रूपे रामरूपाची प्रसिद्ध लौकिक रूपे होत. मनातील 'राम' या रूपांतून जागविण्याच्या असंख्य परंपरा भारतवर्षात आणि विश्वात पाहावयास मिळतात.

इक्ष्वाकू वंश हाच सूर्यवंश म्हणून प्रकटला. राम रूपाने त्याची परंपरा प्रकाशमान झाली. भगवान श्रीकृष्णांच्या रूपाने, भागवत तत्त्वाचा अर्थात 'राम'तत्त्वाचा, अध्यात्मिक आणि व्यावहारिक अद्वैत मार्ग, द्वापारापासून प्रशस्त झाला. वेदोव्यासांनी ब्रह्मसूत्रे, महाभारतातील



भगवद्‌गीता आणि श्रीमद्‌भागवत महापुराण, यांच्या माध्यमातून; भक्ति, ज्ञान आणि वैराग्याचा 'राम' मार्ग निरोपित केला. या मार्गानेच ब्रह्मर्षी नारद, शुकमुनी यांनी वैष्णवभक्तांची अर्थात रामदासांची मांदियाळी, ही परंपरा सिद्ध केली.

## (२०)
## मध्ययुगीन वैष्णव परंपरा

संत श्री गोस्वामी तुलसीदास यांचे 'रामचरितमानस' म्हणजे, वैश्विक रामराष्ट्र विचारांची, आधुनिक युगा करिताची मुहूर्तमेढ आहे! 'राम' तत्त्वाचे निर्गुण, निराकार, निर्विकार, सर्वव्यापी, सार्वकालिक, अविनाशी, महाशून्य, अनंत, श्रीकृष्ण, केवळ, निज, आद्य स्वसंवेद्य असे, सत्‌चिदानंदरूप जसे, तुलसीदासांनी अनुभूत करविले; तसेच लौकिकातील पुरुषार्थपूर्ण जीवन साफल्यातील, रामतत्त्वही, अनुकरणासाठी सर्वांसमोर मांडले. रामचरितमानस हा कलियुगातील विद्यमान कालप्रवाहासाठी सर्वार्थाने कथाज्ञानयज्ञ झाला. रामचरितम ानसाने उत्तर भारतीयांची मने रामदास झाली. रामजन्मभूमी आंदोलनाच्या निमित्ताने सर्वार्थाने हे रामदासपण सर्वांनी अनुभवले. भक्ती, ज्ञान, वैराग्यपूर्णतेने राष्ट्र जागृतीसाठीचा ज्वलंत जहाल संघर्ष हिंदुस्थानातील सर्वांनी अनुभवला.

महर्षी अगस्ति प्रेरित श्री रामानंदस्वामींच्या प्रेरणेने, 'रामतत्त्व' संत श्री तुलसीदासांप्रमाणेच, माऊली ज्ञानेश्वरांचे पिताश्री विठ्ठलपंत यांनाही प्रेरित झाले. प्रपंच आणि परमार्थाचे वैष्णव वृत्तीने अर्थात 'राम' तत्त्वाने अद्वैत अनुभवता येते, हे ठायी सोसाव्या लागलेल्या अतिभीषण सामाजिक, धार्मिक संघर्षातून श्री विठ्ठलस्वामींनी जनमानसाला अनुभूत करविले. तीच परंपरा त्याहीपेक्षा ज्वलंत जहाल, तरी सर्वाभूती 'राम' तत्त्वाचा अनुभव घडवित; माऊली ज्ञानेश्वरांनी संघर्षात्मक ज्ञानवान वर्तनाने सिद्ध

केली. त्यांच्या या ठायीच्या पांडुरंग तथा 'राम' तत्त्वाने वैष्णव धर्माची, अर्थात भागवत धर्माची पायाभरणी केली. राम कृष्ण हरि दासांची प्रभावळ, माऊली संत श्री ज्ञानेश्वर यांच्या भोवती निर्माण झाली. श्री ज्ञानेश्वर ते जगद्गुरू संत तुकोबाराय यांनी वेदांचा, वेदांत, अर्थात 'राम' तत्त्व, रामबाण्याने सर्वांना प्रेरित केला. म्लेंच्छांच्या आणि मोगलांच्या साम्राज्यवादी आक्रमणातही रामबाण्याने, संघर्ष करण्याचे बळ भारतीय राज्यकर्ते आणि समाज यांच्या मनात प्रेरित केले.

## (२१)

माऊली संत श्री ज्ञानेश्वर महाराज, निवृत्ती, सोपान आणि मुक्ताबाई या चार भावंडांनी पांडुरंग विठ्ठल अर्थात राम कृष्ण हरि भक्तीची, पायवाट चोखाळली. या पायवाटेने, संत नामदेव आणि समकालीन संत जनाबाई, संत कबीर, विसोबा, नरहरी सोनार, गोरा कुंभार, सावतामाळी, सेना न्हावी, चोखा महार, सोयरा, कान्होपात्रा असे जवळपास पन्नासावर भागवत संत, सगुण भक्तीचा उत्कर्ष साधत, रामकृष्ण हरि, पांडुरंग, विठ्ठल, केशव या नामावळीने, एकाच 'राम' तत्त्वाचे जागरण करतात.

भक्ती, ज्ञान आणि वैराग्य मार्गाने सत्य, प्रेम, करुणा निष्ठेने विश्वातील चराचरात अद्वैत अनुभवत, मानवी व्यवहार सात्त्विक भावाने घडण्यासाठी आर्त टाहो फोडला. त्यांचा सामाजिक, सांस्कृतिक प्रबोध हा ज्ञानवान कर्म करण्यासाठी असतो. मानवी कर्मशैलीत राम जागविला तर विश्वकल्याण होईल; ही ठाम भावना सर्वांच्याच मनात आहे.

अध्यात्मिक दृष्टीने त्यांनी वैश्विक रामराष्ट्र प्रकट होण्याची अपेक्षा, नकळत; साम्राज्यवाद, अहंकार, स्वार्थांधता, शोषण या विरुद्ध बंड पुकारून; मानव धर्माचे राज्य व्हावे; अशी संतांची उत्कट इच्छा आहे. म्लेंच्छ मोगल अर्थात परकीय आक्रमणाच्या झंझावातात; राजवटींना स्वत्व जागरणासाठी, अर्थात रामराज्य आणण्यासाठी संत पेटवितात.



रामदेवराव यादवांचे देवगिरीचे राज्य, असे वैश्विक रामराष्ट्राच्या उभारणीसाठी ईर्षेने उभे राहावे अशी मनिषा बाळगतात. सर्वाभूती 'राम' अर्थात विष्णूतत्त्वाचा अनुभव, सगुण भक्तीने ज्ञान प्राप्त झाले की येतो; हे सांगत, 'वसुधैव कुटुंबकम'; ही भावना जागृत होते. या विचाराचा प्रचार संत करतात. वरवर पाहाता ही संत मंडळी भजन कीर्तनाच्या माध्यमातून भक्ती आणि प्रबोध करताना, रिकामा टाळकुटेपणा करीत आहेत; असे वाटले तरी वैश्विक रामराष्ट्र उभे करण्यासाठी अध्यात्मिक पातळीवर मने घडविण्याच्या, पाठशाळा चालवत होते; हे लक्षात येते.

राम, कृष्ण हे अवतार ही परमात्म स्वरूपाची, भक्तीसाधनेसाठीची केवळ सगुण प्रतिके किंवा प्रतिमा नसतात; त्यांच्या स्मरण चिंतनासाठी निजरूपाची अर्थात स्वसंवेद्य आत्मरूपाची विश्वात्मक सृष्टीलीला, सात्त्विकतेने, सर्वकल्याणात्मकतेने, सच्चिदानंदरूप व्हावी; यासाठीचा तो निकराचा संघर्ष किंवा लढा असतो, हे ध्यानात येते. त्यांनी मांडलेल्या या लढ्यातून; वैश्विक रामराष्ट्र विचाराचे, सनातन तत्त्व जागृत होऊन; असे सर्वकल्याणात्मक राष्ट्र उभारण्यासाठी पुरुषार्थाला आवाहन असते.

## (२२)

'सर्व सुखाचे आगरू । बापरखुमादेविवरू' असे घोषित करून; 'हरि मुखे म्हणा हरि मुखे म्हणा । पुण्याची गणना कोण करी' असे सांगत माऊली, मनुष्यमात्राला रामराष्ट्रासाठी आवाहन करते.

**'राम बरवा कृष्ण बरवा । सुंदर बरवा बाइयांनो ।।१।।**
**केशव बरवा माधव बरवा । गोपाळ बरवा बाइयांनो ।।२।।**
**बाप रखुमादेविवरू त्रिभुवनीं गरुवा विठ्ठलु बरवा बाइयांनो ।।३।।**

असे भक्तिपूर्ण रामदासपण स्वीकारले तर; जीवनाचे कल्याण होईल असे

सांगून;

**स्वर्ग जयाची साळोंखा । समुद्र पाळी पिंड देखा । शेषासरिखी बैसका ।**
**जो आधार तिही लोकीं ।।१।।**
**लिंग देखिलें देखिलें । त्रिभुवनी विस्तारलें ।।२।।**
**मघधारीं तपन केलें । तारापुष्पीं वरी पूजिलें । चंद्रफळ ज्या वाहिलें ।**
**वोवाळिलें रविदीपें ।।३।।**
**आत्मनैवेद्य समर्पिलें । ब्रह्मानंद मग वंदिले । ज्योतिर्लिंग मग घ्याईलें**
**ज्ञानदेवी हृदयीं ।।४।।**

अवघ्या विश्वरूपाने, तोच प्रकटला असून; विश्वातील प्रकटरूपे ही या विश्वस्वरूपाचे, अर्थात आत्मारामाचे, शिवस्वरूपाचे, पूजन करीत आहेत. असे वर्णन करून बाईयांना अर्थात मातृभावनेला, आपल्यातील आत्मरूपाचे, विश्वात्मक दर्शन घडवित; पूजन स्वरूप, संसारप्रपंच करण्याचा प्रबोध माऊली करतात. पूजनभावाने विश्वात्मक आत्मरूपाचे, अर्थात सृष्टीस्वरूप लिंगरूपाचे आराधन हेच विश्वात्मक रामराष्ट्राचे आराधन होय.

भक्तीने ज्ञान प्रकाशते. आत्मरूप ठायीच संवेदित होते. मनामनात राम प्रकटतो. सनातन विश्वात्मक रामराष्ट्र प्रकटते. अबाधित सात्त्विक भावाने, मनुष्यमात्र, विश्वकुटुंबियत्वाने नांदावे, यासाठी विष्णूतत्त्वाचे अवतार कार्य सगुण रूपात घडते.

**'मत्स्यकूर्मादिक ज्याचे महिमेची आले । धन्य वैष्णव तेज रविशशिसी**
**पाहाले ।।७।।'**

असे प्रमाणाने सांगतात. रविशशींच्या परंपरेएवढी ही वैश्विक रामराष्ट्राची, अर्थात मनातील विष्णूतत्त्व अर्थात सर्वाभूती 'राम'तत्त्व असल्याची



जाणीव सनातन आहे. रामदासपणाने ठायीच्या या विश्वरूपाचे अर्थात आद्य स्वसंवेद्य आत्मरूपाचे दर्शन घडते आणि

**'जाली ते विश्रांति याचकां सकळा । जीवीं जीवन कळा श्रीमूर्तिरया**
**।।२।।**

अशी ठायीच अवस्था प्राप्त होते. यासाठी प्रमाणे देतांना माऊली सनातन रामदास परंपरेचे प्रमाण देतात.

**'श्रवणें कीर्तनें जाले ते पावन । सनकादिक जाण परम भक्त ।।१।।**
**जाली ते विश्रांति याचकां सकळां । जीवीं जीवनकळा श्रीमूर्तिरया**
**।।२।।**
**पादसेवनें अक्रूर जाला ब्रह्मरूप । प्रत्यक्ष स्वरूप गोविंदाचें ।।३।।**
**सख्यपणें अर्जुन नरनारायणीं । सृष्टि जनार्दनीं एकरूप ।।४।।**
**दास्यत्व निकट हनुमंतें केलें । म्हणोनिं देखिले रामचरण ।।५।।**
**बळि आणि भीष्म प्रल्हाद नारद । बिभीषणावरद चंद्रार्क ।।६।।**
**व्यास आणि वसिष्ठ वाल्मिकादिक । आणिक पुंडलिकादि शिरोमणि**
**।।७।।**
**शुकादिक योगी रंगले श्रीरंगी । परिक्षिता अंगी ठसावले ।।८।।**
**उद्धव यादव आणि ते गोपाळ । गोपिकांचा मेळ ब्रह्मरूप ।।९।।**
**अनंत भक्त राशी तरले ते वानर । ज्ञानदेवा घर चिदानंदी ।।१०।।'**

भक्तीने सर्वात्मक परब्रह्माचे, अर्थात राम, कृष्ण, हरि, गोविंद, नारायण, जनार्दन या सगुण रूपातील निर्गुणाचे ठायीच ज्ञान होऊन; ठायीच विश्वव्यापकतेचे दर्शन घेऊन, विश्वकल्याणासाठी, सत्यनिष्ठेने, प्रेमभावाने आणि कारुण्यपूर्ण संवेदनेने मानवाचे ज्ञानवान कर्म घडते. हे या रामदास परंपरेतून माऊली स्पष्ट करतातच. त्याबरोबर ही सर्वविभूतिमत्वे

ठायीच भक्तिभावाने, विश्वव्यापक आत्मरूपाची ठायीच अनुभूति घेऊन; सर्वाभूती ती अनुभूति प्रकटावी यासाठी अज्ञान, अहंकार, दांभिकता, क्रौर्य, शोषकता, स्वार्थांधता, सत्तालोलुपता, या विश्वकुटुंबियत्वाला बाधा आणणाऱ्या, खलप्रवृत्तींविरुद्ध, कुटुंबव्यवहार, समाजव्यवहार, राज्यव्यवहार, शिक्षण, तथाकथित धर्मसत्ता, या सर्व क्षेत्रांत निकराचा, भीषण तथा प्रलयंकारी संघर्ष करून; रामराष्ट्र उभारण्यासाठी मनःपूर्वक प्रयत्नशील होत्या. म्हणजेच वैश्विक रामराष्ट्र ही सनातन सर्वकल्याणात्मक कल्पना वास्तवात आणून विश्वशांतीसाठी सुखासाठी सच्चिदानंद अवस्थेसाठी, रामदासपणे या विभूति झटत होत्या; हे माऊलींनी सनातनाच्या इतिहासातून सप्रमाण स्पष्ट केले आहे.

## (२३)

माऊली संत श्री ज्ञानेश्वरांनी अमृतानुभव, चांगदेव पासष्टी, हरिपाठ यांतून तर चिद्विलास वादाच्या, अनुभवसिद्धीने, ठायीच असलेल्या, विश्वात्मक परमेश्वराचे, अद्वैत दर्शन घडविलेच. त्याचबरोबर, सर्वसामान्यांना, वेदांत समजावा, लौकिक व्यवहार ज्ञानवानपणाने कसा करावा हे समजावे असा ज्ञानवान कर्म अर्थात निष्काम कर्म करतांना, कोणत्या प्रकारचा संघर्ष करण्याचा स्वधर्म पाळावा लागतो; धर्माचे अर्थात रामतत्त्वाचे, अर्थात सर्वाभूती परमेश्वर जाणिवेने राज्य निर्माण करायचे तर; मनात रामकृष्ण हरितत्वाचे अर्थात 'राम' मनाचे जागरण होणे आवश्यक असते; हे समजावून सांगण्यासाठी; सर्व प्रकारचा आणि सर्व स्तरावरील संघर्षाचा सर्वविनाशक संघर्षाचा इतिहास सांगणाऱ्या 'महाभारत' या ग्रंथातील वेदांत प्रबोधित करणाऱ्या; प्रत्यक्ष, पूर्णावतार, भगवान श्रीकृष्णमुखाने प्रकटलेल्या श्रीमद्‌भगद् गीतेवर भावार्थ दीपिका स्वरूप भाष्य करून; विश्वात्मक देवाकडे रामदासपणाने 'पसायदान' मागितले. हे 'पसायदान' म्हणजे विश्वात वैश्विक रामराष्ट्र प्रस्थापनेसाठी



सनद मागणेच होय! है वैश्विक रामराष्ट्र सफल होईल, असा आशीर्वादही सद्‌गुरूंनी माऊलींना दिला. या सनदेप्रमाणे, 'भूतां परस्परें पडो । मैत्र जीवांचे ।', 'विश्व (अर्थात सर्वाभूती परमेश्वर ज्ञानाने वर्तन) असा स्वधर्म सूर्ये पाहो ।' असे होऊन, 'किंबहुना सर्वसुखीं । पूर्ण होऊनी तिही लोकी । (पुरुषार्थपूर्ण कर्तव्यतत्परतेने स्वर्ग मृत्यू पाताळ या तीनही प्रकारच्या जीवनानुभूतीचे ठिकाणी) दृष्टादृष्ट (सर्व लोक) विजयें । होआवें जी ।''१८००।। असे अखेरी सर्वांना पुरुषार्थपूर्ण वैश्विक रामराष्ट्र अनुभवता यावे, अशी कामना केली आहे.

## (२४)

संत श्री नामदेव महाराज 'श्रीराम माहात्म्य' यात संपूर्ण रामावताराचे रहस्य सांगतात,

**'धन्य ते संसारी पवित्र ते वाणी । अखंड उच्चारणी रामनाम ।।१।।**
**तयांचीच सरळी येरझार । उतरले पार भवनदी ।।२।।'**

म्हणजेच सर्वकल्याणाची अवस्था रामस्वरूप मन होण्यातच असल्याची ग्वाही देतात.

हेच वेगळ्या शब्दात संत जनाबाई सांगतात,

**'मना लागो हाचि धंदा । रामकृष्ण हरि गोविंदा ।।१।।**
**जिव्हे करूं नित्य नेम । सदा विठोबाचे नाम ।।२।।**
**नामामध्ये नानसार । जप करी निरंतर ।।३।।**
**म्हणे जनी नाम घेणे । नाममंत्रे शंकर होणे ।।४।।'**

याचसाठी जनाबाई हरिश्चंद्र आख्यान सांगतात,

**'नारद सांगे मृत्युलोकीं । हरिश्चंद्र पुण्यश्लोकी ।।१।।**
**कैला सत्वाचा समुद्र । ऐसा नाही नृपवर ।।२।।'**

विश्वात्मक रामराष्ट्राचा आदर्श म्हणजे हरिश्चंद्र होय. विश्वात्मक रामराष्ट्र प्रस्थापनेसाठी दशावतारांचा खेळ भगवान विष्णू खेळत आहेत हे 'दशावतार वर्णन' या अभंगातून जनाबाई सांगतात.

संत कबीर तर

**'मेरा मन रामनामसे लागा । मुजे देखके जमकाल भागा ।।१।।**
**अंदर भीतर भयो उजाला । काल कंटकसो ना पाऊ नामा ।।२।।'**

असे म्हणून विश्वात्मक रामराष्ट्राच्या सर्वकल्याणात्मकतेची ग्वाही देतात.

रामराष्ट्रात सर्वांच्या उद्धाराची ग्वाही सेनामहाराज देतात,

**'रामें अहिल्या उद्धरिली । रामें गणिका तारीली ।।१।।**
**म्हणा राम श्रीराम । भवसिंधु तारक राम ।।२।।**
**रामें जटायु तारिलें । रामें वानरा उद्धरिलें ।।३।।**
**ऐसा आयोध्येचा राजा । सेना म्हणे बाप माझा।।४।।'**

संत चोखोबा म्हणतात,

**'अवघा आनंदा राम परमानंदा । हाचि लागो छंद माझे जीवा ।।१।।**
**हेंचि साधन निळे जगासी उद्धार । आणीक साचार दुजें नाहीं ।।२।।**
**काम क्रोधांचें न पडती आघात । वाचे गातां गीत रामनाम ।।३।।**
**चोखा म्हणे ऐसा भरंवसा नामाचा । जेथें कळिकाळाचा रीघ नाही ।।४।।''**



जगदोद्धारासाठी मनामनात 'राम' जागवणे, एवढेच उपाय आहे, असे चोखोबा स्पष्ट करतात.

**'अवघा रंग एक झाला । रंगी रंगला श्रीरंग ।।१।।'**

या अनुभूतीने अध्यात्म हा वैश्विक रामराष्ट्राचा आत्मा आहे असेच स्पष्ट करतात.

(२५)

चंद्रभट बोधले शिष्य, जनार्दनस्वामी भ्राता, संत एकनाथ, संत तुकाराम व संत रामदास यांच्यामधील कालखंडाचा, भागवत तथा रामदासी दुवा, महासमन्वय, संत श्री शेख महंमद महाराज यांनी 'राम'तत्त्वाचे उद्‌घाटन करून; आक्रमणे करणाऱ्या साम्राज्यवादी लुटारू राजवटींविरुद्ध वैश्विक रामराष्ट्राच्या पुनरुत्थानासाठी, जणू सर्व रामदासांना तथा भागवतांना अर्थात सर्व पंथोपपंथाने भक्तिमार्गात आणि ज्ञानयोग मार्गात असणाऱ्या संतांना रामतत्त्वाची हाक दिली.

**'रामी आराम । आरामीं राम । सांडुनि आत्मज्ञानी । वोळखा ।।धृ।।**
**जितुकें दिसें । तितुकें नासें । नाशवंत अविनाशे । अनिवार राम ।।१।।**
**सद्‌गुरू कृपे अजपजपे । शेख महंमद समत्वे । दीर्घ दम ।।२।।'**

'राम' हे तत्त्व आहे. राम तत्त्वाची 'राम' या सगुण रूपात, आराधना करून; समत्वाने अविनाशी अशा राम तत्त्वापर्यंत जाता येते. 'राम' तत्त्व जप केल्याने अर्थात जागरणाने सर्व दुरितांवर मात करता येईल. सर्व युद्धे जिंकता येतील; असा विश्वास संत शेख महंमदांना आहे,

**'राम जपां मंत्र सोपा । महा पापा, हो धुनी ।।१।।
शिवा कंठी राम गांठी । शांती उठी, हळाहळाची ।।२।।
विश्वासे तत्त्व, उच्चारीं । नाही भवपुरी शेखमहंमदा ।।३।।'**

शेख महंमदांना 'राम' तत्त्वाचे दास होणे अभिप्रेत आहे. तत्त्वाचे दास म्हणजे प्रत्यक्ष तत्त्व होऊन जगणे. रामस्वरूप झाले; की सकल कल्याणकारी फळ आपसूकच मिळणार, असे संत शेख महंमद महाराज स्पष्ट करतात.

'योगसंग्रामात' ते दास्यभक्तीकरिता, हनुमंताचे प्रमाण देतात. पंधराव्या अध्यायात असे प्रमाण देतांना संत शेख महंमद सांगतात,

**'दास्यत्व साजे हनुमंताप्रति । त्यासी रामायणात जगी कीर्ती। ऐशीच पाहिजे भक्ति निरुति । समस्तालागी भावें ।।३।।'**

संत शेख महंमद म्हणतात,

**'तैसा तत्वबोधी गुज निवांत । नकळे त्या साधुचा अंत । ऐका वैखरी हे ज्ञाना मात । श्रोत्यांस कळो आले ।।१११।।'
'हनुमान पाहा यातिचा वानरू । त्यास गुज बोले रामचंद्रा । संपल्या देहाचा अवतार । द्वापारी भेट दिधली ।।६७९ अ. १६।।**

संत शेख महंमद 'विश्वव्यापक निज (रूप) परमेश्वरा । रहिमान साचा (त्यालाच मुस्लिम रहिमान म्हणतात.) वैश्विक रामराष्ट्र प्रकटविण्यासाठी, रामदास व्हावे लागते अर्थात भक्तीने जीवात्म्याने रामस्वरूप व्हावे हे पटवून देताना असे रामस्वरूपाने प्रकटले की; स्वार्थ, अहंकार इ. गोष्टींचा नाश होतो. योगसंग्रामाच्या सतराव्या अध्यायात त्रेतायुगातील दशरथ पुत्र रामचंद्राचे चरित्र सांगतात. शेख महंमद महाराज म्हणतात,



**''ईश्वर म्हणजे विश्वंभर । दगडांचा नोहे ओळखा जाहिर । ज्यांपासून असंख्य अवतार । रामकृष्णादि जन्मले ।।७०।।अ.१८।।**

ते स्पष्ट करतात,

**'कोणी म्हणाल राम दाशरथीं । रामापासून अवतार असंख्याती । हे खुणा नेणोन म्हणतसे छळती । यवना सहित ।।२३२.यो.सं. १८।।'**

यासाठी 'राम' हे तत्त्व आहे हे लक्षात घ्यावे. 'राम' तत्त्व म्हणजेच विश्वंभर तत्त्व होय. असा रामयोग साधून; मनात 'राम' जागवून वैश्विक रामराष्ट्रासाठी, 'योगसंग्राम' साधावा, असे शेखमहंमद उपदेशितात.

मुळात श्रावण बाळाने 'राम' तत्त्वाचा उच्चार केला होता; म्हणून दशरथाने पुत्राचे नाव 'राम' ठेवले,

**श्री राम राम करी श्रावण । मग दशरथे उपाडिला बाण । तंव श्रावणे सोडिला प्राण । जाचुदे तळमळी ।।२४२।।
दशरथ तिघांचे सरण दहन केले । पुत्र झाल्या राम ऐसे नाव ठेविले । तळमळोन उसने दिधले । हे श्रोते जाणती ।।२४४।।
श्रावणे राम राम म्हणितले । म्हणऊन दशरथे पुत्राचे नाम ठेविले । हे पाहिजे श्रोत्यांस कळले । राम नाम अगाध जे ।।२४५।।**

'राम' हेच आद्य स्वसंवेद्य आत्मरूप असून; ते विश्वंभर आहे. रामअवतार हे त्याचे परिपूर्ण मानवी रूप आहे; म्हणूनच 'राम' हा विश्वंभराचा अवतार आहे, असे शेख महंमद म्हणतात.

## (२६)

'राम' तत्त्वाचा आणि वैश्विक रामराष्ट्राच्या उभारणीचा, उपदेश करणाऱ्या, संत श्री शेख महंमद महाराज यांना; शिवसाक्षात्कारी; छत्रपती शिवरायांचे आजोबा, अर्थात शहाजीराजांचे वडील यांनी; दक्षिण काशी समान तीर्थक्षेत्र असरलेल्या; सरस्वती नदीच्या तीरावर, श्रीपूर अर्थात, श्री लक्ष्मीदेवी आणि जेथे कलियुगात पांडुरंगांचे अष्टवर्षीय बालगोपाल रूपात अवतरण झाले; अशा श्रीगोंदा गावात, म्हणजे सरस्वती चंद्रभागा अशा महायोग क्षेत्रात; स्वतंत्र मकरंदपेठ वसवून; पेठेत मठाची उभारणी करून दिली. त्यांना प्रतिष्ठापित केले. तसा चक्रनामा लिहून दिला. याच क्षेत्रात संत श्री शेखमहंमद महाराजांनी संजीवन समाधी घेतली. या सरस्वती चंद्रभागा क्षेत्रात, पांडुरंगाच्या सान्निध्यात, दांडेकर मळ्यातील श्री गणपती मंदिरात संत श्री शेखमहंमद महाराज यांची जगद्गुरू संत तुकोबाराय, राऊळबुवा, गोदडबुवा आणि प्रल्हाद महाराज यांच्याशी अध्यात्मिक चर्चा चाले. संत श्री रामदास यांची संत श्री शेखमहंमद महाराज यांच्याशीही अध्यात्मिक चर्चा याच क्षेत्रात झाली. स्वामी रामदासांनी संत श्री शेखमहंमद महाराज यांची आरती लिहिली. ती पारंपरिक आरती, 'जय जय आरती जय महंमद शेख ।। तुज ब्रह्मादी वर्णिती तुज अनंत गज विवेकातन ।।धृ।। याप्रमाणे असल्याचे सांगितले जाते.

## (२७)

सर्वाभूती 'राम' असा वेदांत साक्षात्कार घडविणारे, शांती ब्रह्म संत श्री एकनाथ महाराज यांचे वैश्विक रामराष्ट्राच्या जागरणासाठीचे अलौकिक असे अध्यात्मिक आणि सामाजिक कार्य सर्वज्ञात आहे. जात, पंथ, धर्म यांना सामरस्याने जवळ करीत; नाथांनी 'राम' तत्त्वाचा प्रबोध, वाल्मिकी रामायणातील दाशरथी रामांच्या, सगुण स्वरूपाधारे, अर्थात 'भावार्थ रामायणाधारे' केला.

वेदोपनिषदांचे सारभूत असलेल्या श्रीमद्भगवद् गीतेवरील माऊली श्री संत ज्ञानेश्वर महाराज लिखित 'ज्ञानेश्वरी' पाठशुद्ध स्वरूपात प्रसिद्ध केली. भागवताच्या एकादश स्कंधावर टीका लिहून भागवत संप्रदायाला खांब दिला. 'रुक्मिणी स्वयंवर' यात कृष्णलीलेचा गौरव केला. अवतार कथा, देवदेवतांची आख्याने, भक्त चरित्रे, अध्यात्मिक स्फुट प्रकरणे, याशिवाय ओवीबद्ध व अभंगस्वरूपातील, तसेच लोकछंदातील भारूडे, अशी विपुल रचना केली. ही सर्व रचना वेदांतस्वरूप 'राम'तत्त्वाचे जागरण करून; वैश्विक रामराष्ट्राचे आराधन करते. 'राम'तत्त्वाच्या, श्रीकृष्ण, गोविंद, केशव, गोपाळ, पांडुरंग, श्री विठ्ठल स्वरूपांचे वर्णन भक्तिभावाने करीत; संत श्री एकनाथ महाराजांनी, 'राम' तत्त्वाचा जागर संकीर्तनातून केला. श्री विठ्ठल हेच अंतरीचे 'आत्माराम' तत्त्व होय. हे सर्वाभूती आहे. हे ओळखून वर्तन करावे. असा वैश्विक रामराष्ट्राचा प्रबोध त्यांनी केला.

**'कैचें आम्हा यातीकुळ । कैचें आम्ही धर्मशील ।।१।।**
**तुझें नामीं अनुसरलों । तिही लोकी सरते झालों ।।२।।**
**कैचीं क्रिया कैचें कर्म । कैंचा वर्णाश्रम धर्म ।।३।।**
**एका जनार्दनी यातीकुळ । अवघा व्यापक विठ्ठल ।।४।।**

असे घोषित करून ठायीच विश्वात्मक सत्यनिष्ठा आणि प्रेम जागविले.

'श्रीराम महिमा' गाताना अध्यात्म आणि लौकिक व्यवहार या दोन्ही ठिकाणी 'राम' तत्त्व जागरणाने सच्चिदानंदरूप मोक्षप्राप्ती होईल; याची ग्वाही नाथांनी दिली.

**'सुख रामनामें अपार । शंकर जाणें तो विचार ।।१।।
गणिका जाणें रामनाम । गजेंद्र उद्धरिला राम ।।२।।
शिळा मुक्त केली । रामनामें पदा गेलीं ।।३।।
तारिले वानर । रामनामे ते साचार ।।४।।
रामनामें ऐसी ख्याती । एका जनार्दनी प्रीती ।।५।।'**

असा महिमा गातांना, रामवृत्तीचा महिमा रामदासपणे गातात,

**'चरणरज लागुनी उद्धरली अहिल्या बाळा । रामा तुझेनि प्रतापें तरली भवसागर शीळा ।।१।।
जयजय रामरामा शामा भवभंजन नामें । तुझें रूप ध्यातां उमा शिवनिवे ।।२।।
रामनामे कळिकाळ कापती सदा । रामनामें गणिका गेली निजपदा ।।३।।
रामनामें उद्धरलें सुर, नर, वानर । एका जनार्दनी सदा समाधिं स्थिर ।।४।।'**

पुढील अभंगात संत एकनाथ म्हणतात,

**'राम सर्वांघटी व्यापक संचला । जैसा भाव तया तैसा भेटला ।।१।।
रीस आणि वानर साक्षसहि पहाती । सर्वा एकची मुक्ति रामसंगे ।।२।।
वैर अथवा सख्य वाचे वदे राम । मुक्ति आम्हां राम स्वयें देती ।।३।।
एका जनार्दनीं वदतां निष्काम । स्वर्ग सुखदेत राजा राम ।।४।।'**

'राम' तत्त्व जागले की सामाजिक, सांस्कृतिक, नैतिक, राजकीय अशा सर्व क्षेत्रात निष्काम संघर्ष घडतो आणि सर्वांना ठायीच मुक्तीचा अनुभव येतो. याचे उत्तम उदाहरण म्हणजे रामराजा हे होय.



वैश्विक रामराष्ट्र प्रकटविण्यासाठी मनात राम प्रकटला पाहिजे. ठायी राम प्रकटला तर रावणासारख्या पराकोटीच्या अहंकाराचेही निर्दालन करता येते आणि देव, दानव, मानव, वानर, पशु, पक्षी सर्वांना सच्चिदानंद स्वरूपाचा ठायीच आनंद भोगता येतो. हे भावार्थ रामायणातून अध्यात्मिक आणि भौतिक स्तरावर संत एकनाथांनी जसे पटवून दिले; तसेच वैश्विक रामराष्ट्र प्रकटले तर; मदांधसत्ता नाहीशी होऊन; स्वरूपसत्ता प्रकटते; हे श्रीरामचरित्रपर अभंगातील 'सीता-मंदोदरी' संवादांतून स्पष्ट केले आहे. मंदोदरीच्या प्रश्नांना सीतामाई उत्तर देतात,

**'राम सर्वांच्या हृदयीं आहे । धरितां त्या हृदयस्थाची सोये । तेथें रामरावण कोठे आहें । सांग माये यथार्थ ।।१।।
भोगितां हृदयस्थासी । अवकाश कैसा भोक्तियासी । तेथें रावण कैंचा आणिसी । जें तयासी भोगावें ।।२।।
दृश्याचिये भेटी । दृश्यपणें उठी । होता तेजेंसी तुटी । तोही शेवटीं असेना ।।३।।
आतां नाहीपण असे । असे तोचि दिसे । एका जनार्दनीं पिसे । रावणाचें कायसें ।।४।।'**

हृदयीचा राम रावणाचे ठायी प्रकटला तर रावणही रामस्वरूप होऊन; वर्तन करू लागेल. म्हणून ठायी राम प्रकटणे, हे विश्वाच्या सत्यनिष्ठा, प्रेममयता आणि सर्वाभूती राम असा समत्व पूर्ण कारुणभाव, प्रकट करण्याची साधना रामदासपणाने करतात. रावण रामदास झाला की रावणपणच गळून पडेल.

'राम रावण युद्ध रंगवितांना दोन महासत्तांचे युद्ध रंगविले आहे. हे युद्ध अज्ञानमूलक षड्रिपुयुक्त रावण आणि ज्ञानस्वरूप निर्गुण, निराकार, निर्विकार, सर्वात्मक राम, या माणसांच्या ठायींच्या, दोन महासत्तांतील युद्ध आहे. ज्ञान प्रकाशले की अज्ञान कसे राहणार? राम प्रकटला की

रावण कसा राहणार; या शुद्ध विवेकाने रामदासपणाने; स्वतः राम, वानर, बिभिषण सारेच लढत आहेत. तेव्हा या रामदासांचा या युद्धात विजय निश्चित आहे.

## (२८)

सत्य शाश्वत आहे. असत्य अशाश्वत आहे. 'राम' तत्त्व म्हणजे सत्य, प्रेम, करुणा युक्त शाश्वतता. ती प्रकटली तर अवघा मानव समत्वाने समरसतेने ज्ञानवान कर्म करू लागेल. हेच विश्व रामराष्ट्र उभविण्याचे रामदासांचे ध्येय आहे.

रामदासांचे वैश्विक रामराष्ट्र निर्मिण्याच्या दृष्टीने, कलियुगाचे ठायी; प्रथम क्रमांकाने रामदासपण स्वीकारणाऱ्या प्रत्यक्ष भगवान शिवांनी, राष्ट्रमाता जिजाऊसाहेबांच्या उदरी जन्मास येण्याचा, शिवभक्त, ज्योतिर्लिंगांची यात्रा समल करणाऱ्या, घृष्णेश्वरांचे निःस्सीम भक्त, अर्थात पर्यायाने, भगवान शिवांच्या मार्गे, रामदास असणाऱ्या, मालोजीराजांना, स्वप्नी संकेत दिला. रामदास्याने भक्ती करणारे, संत शेखमहंमद महाराजांचे शिष्य मालोजीराजे यांच्या भोसले घराण्यात, शहाजीराजे आणि जिजाऊसाहेब यांचे उदरी, शिवस्वरूप रामदास छत्रपती शिवाजी राजांचा जन्म झाला. ही कलियुगातील वैश्विक रामराष्ट्र निर्मितीसाठीची अलौकिक लीला होय. याचे वर्णन मल्हारराव रामराव चिटणवीसांनी शिवछत्रपतींच्या बखरीमध्ये केले आहे. त्रेतायुगातील प्रभू रामचंद्र, द्वापारातील श्रीकृष्ण व धर्मराज आणि कलियुगातील छत्रपती शिवाजी महाराज, हे मानवी अवतारातील आदर्श वैश्विक रामराष्ट्रपुरुष होय. ठायीचे रामतत्त्व अनुभवत सर्वांठायी रामतत्त्व अनुभूत करून देऊन; सर्वकल्याणात्मक रामराज्य तथा रामराष्ट्र उभारण्याकरिता सर्वांना कर्मरत केले, ते शिवरायांनी.

प्रभू रामचंद्र हे 'राम' स्वरूपात प्रकटण्यासाठी, वसिष्ठ, विश्वामित्र, अगस्त्य आदिऋषींचे मार्गदर्शन, प्रभूंना मिळाले. धर्मराजांना भीष्म, द्रोणाचार्य, कृपाचार्य आणि साक्षात 'राम' तत्त्वाचा पूर्णावतार, जगद्गुरू भगवान श्रीकृष्ण यांचे मार्गदर्शन लाभले. त्याचप्रमाणे, छत्रपती शिवरायांना मातोश्री जिजाऊसाहेब, पिताश्री शहाजीराजे, राजगुरू दादोजी कोंडदेव, यांच्याकडून मिळालेल्या रामायण, महाभारत कथामृताचे, पुराणांचे बाळकडू मिळाले. तसेच वेदांत प्रणित 'राम' तत्त्वाचे मार्गदर्शन अनुग्रहपूर्वक देणारे; प्रत्यक्ष जगद्गुरू भागवत कळस संत तुकाराम महाराज आणि रामदास, हनुमान भक्त, असे संत स्वामी समर्थ रामदास यांचे मार्गदर्शन लाभले.

अध्यात्मिक आणि लौकिक राजव्यवहारात सर्व सवंगडी आणि रयत यांच्या ठायीचे 'राम' तत्त्व अर्थात समत्व दृष्टी प्रकटवून; जनताजनार्दनाचे, समग्र कल्याणकारी हिंदवी स्वराज्य, अर्थात स्वरूपाविष्कार घडविणारे राज्य, तथा राष्ट्र निर्मितीचे सामर्थ्य या शिवस्वरूपात प्रकटले. राम दासपणाने 'राष्ट्राय स्वः इदन् न मम्' अशा 'राम तत्त्व आविष्काराचे स्वराज्य मन, मनामनात प्रकट झाले.

'हे श्रींचे राज्य' अर्थात हे चराचराच्या ठायीच्या 'राम' तत्त्वाचे राज्य आहे, या शैलीने, वैश्विक रामराष्ट्राचे, प्रत्यक्ष वास्तविक रूप जगताने पाहिले! कलियुगाच्या ठायी रामदासांचे वैश्विक रामराष्ट्र निर्माण करता येते; याचा वस्तुपाठ जगताने पाहिला. 'विष्णूमय जग । वैष्णवांचा धर्म । भेदाभेद भ्रम । अमंगळ ।। कोणाही जीवाचा । न घडो मत्सर । वर्म सर्वेश्वरी । पूजनाचे ।।' या वारकरी धर्माचे, धारकऱ्यांमध्ये दर्शन घडविणारे आदर्श वैश्विक रामराष्ट्र स्वरूप, जगताने अनुभवले. म्हणूनच शिवदास्यपण म्हणजेच रामदासपण असे अद्वैत कलियुगाच्या ठायी प्रकटले. जगद्गुरू संत तुकोबारायांनी मनामनात 'राम' जागवला. शिवछत्रपतींच्या रूपाने हा 'राम' बरबरता पूर्ण, यावनी सत्तेला आव्हान देऊन; वैश्विक रामराष्ट्र निर्मिण्यासाठी प्रकटला.

## (२९)

संत श्री नामदेव, ज्ञानदेव समकालीन संत श्री विश्वंभर, यांच्या मोरे कुळातील, आंबिले घराण्यात, आठव्या वंश रूपात, श्री वैष्णव भक्तीच्या परंपरेत, अर्थात विठ्ठलभक्तीच्या परंपरेत, जगद्‌गुरू संत तुकोबाराय अवतारित झाले! श्रुती, स्मृती, पुराणे, श्रीमद्‌भगवद्‌गीता, रामायण, महाभारत, शास्त्रग्रंथ यांचे ज्ञान त्यांना परंपरेने, संचित स्वरूपात आणि प्रखर तपस्येने, उदा. नाथ भागवताची हजार पारायणे त्यांनी भंडाऱ्या डोंगरावर केली. त्यांच्या ठायी प्रकटले. त्यांचा स्वाध्यायावर भर होता. वैराग्याला साजेसे गोसावी हे नावही त्यांनी वृत्तीबोधकतेने स्वीकारले. प्रत्यक्ष 'राम' तत्त्व अर्थात पांडुरंग, विठ्ठल, हरि, श्रीकृष्ण, विष्णू, नारायण इ. नावाने ओळखले जाणारे पारंपरिक दैवत, विठ्ठल हेच आपले गुरू, असे त्यांनी मानले. त्यांना प्रत्यक्ष 'राम' तत्त्वाचा सगुण स्वरूपात गुरुपदेश मिळाला. गंगेवर स्नानास जातांना सद्‌गुरू भेटले. मस्तकी हात ठेवला, राघव चैतन्य – केशव चैतन्य ही गुरूपरंपरा सांगितली. बाबाजी असे स्वतःचे नाव सांगितले. 'राम कृष्ण हरी' हा आवडीचा मंत्रच बीजमंत्र म्हणून सांगितला. प्रत्यक्ष राघवांनी जगद्‌गुरू संत तुकोबारायांना तु–का–राम असे नाव दिले. तूच 'राम' आहेस, असे ज्ञान झाले. हा सर्व उपदेष त्यांना स्वप्नात झाला. त्या क्षणापासून माणसामाणसातील 'राम' जागृत करून; सर्वाभूती 'राम' अनुभवाऱ्या रामांची अर्थात रामकृष्णहरि, भक्ती – त्यातून ज्ञान आणि त्यातून वैराग्यपूर्ण कर्म, अर्थात सर्वात्मक कल्याणासाठी कर्म करणारा, माणूस जागविण्यासाठीचा, अध्यात्मिक आणि भौतिक संघर्ष, अर्थात युद्ध त्यांनी मांडले. विश्वात्मक 'राम' तत्त्वाचे, ठायीच अनुभूती घेऊन; वैश्विक रामराष्ट्र घडविण्याची संत तुकोबारायांची केवढी दुर्दम्य इच्छा आणि तेवढी आकांतपूर्ण तपश्चर्या!

**'रक्त श्वेत कृष्ण पीत प्रभा भिन्न । चिन्मय अंजन सुदले डोळा ।।**
**तेणें अंजनगुण दिव्य दृष्टी जालीं । कल्पना निमाली द्वैताद्वैत ।।**



**देशकाल वस्तुभेद मावळला । आत्मा निर्वाळला विश्वाकार ।।**
**न जाला प्रपंच आहे परब्रह्म । अहं सोहं ब्रह्म आकळले ।।**
**तत्वमसि विद्या ब्रह्मानंद सांग । तोचि जाला अंके तुका आता ।।'**

ठायीच्या अद्वैतानुभूतीने, संत तुकोबाराय रामस्वरूप प्रकटले. प्रत्येकाच्या ठायी स्वरूपाचा अनुभव घेण्याचा प्रयत्न करू लागले.

असे संसार प्रपंचात अद्वैत संवेदित करणे, किती अवघड आहे; याची व्यावहारिक जाणीव, तुकोबारायांना होती. त्यामुळे अवतीभोवतीच्या स्थिती गतीत, रामतत्त्वाने परिवर्तन व्हावे आणि वैश्विक रामराष्ट्र मनाने सर्वांनी वागावे; असा वैष्णवधर्म त्यांनी 'विष्णूमय जग' या अभंगातून सांगितला.

जगद्‌गुरू तुकोबारायांना स्वराज्याचे सुखद दिवस पाहाण्याची दुर्दम्य इच्छा असूनही, पाहता आले नाहीत. मात्र पाच पातशाह्या आणि दिल्लीपती मोगल, सारेच साम्राज्यवादी रामराष्ट्र शोषक! त्यांच्यात सतत सत्ता–संघर्षाच्या लढाया होत. या रगाड्यात जनता भेदरलेल्या स्थितीत दिवस काढीत होती. दुष्काळ, अतिवर्षण अशी आस्मानी आणि सत्तासंघर्षाची सुलतानी या दुरावस्थेने तुकोबा व्याकूळ झाले.

**'न घडे यावरी न धरवे धीर । पीडिता राष्ट्र देखोनि जग । तुका म्हणे तुम्हीं दिसे मोकळिलें । काय आतां आलें जीवित्वाचें ।।'**

अशी अखेरपर्यंत राष्ट्र आणि समाज यांची काळजी तुकोबारायांना होती. त्यात एकमेव आशेचा किरण म्हणजे छत्रपती शिवराय होत! 'सकल संतगाथेत' डॉ. र. रा. गोसावी लिहितात, महाराजांनी अनुग्रहाविषयी विचारले तेव्हा तुकोबांनी रामदासांकडे बोट दाखवित म्हटले,
**'सद्‌गुरू रामदासांचे भाषण । तेथे घाली मन चळों नकों । बहुतांची वृत्ती चाळविली जेव्हां । रामदास्य तेव्हां घडे केवी ।।'**

संत तुकोबारायांनी शिवछत्रपतींना रामदासपण अंगी बाणण्याचा उपदेश केला.

**'आम्ही तेणे सुखी । म्हणा विठ्ठल विठ्ठल मुखी ।।१।।**
**तुमचे येर वित्तधन । ते मज मृत्तिके समान ।।२।।**
**कंठी मिळवा तुळशीमाळ । व्रत करा एकादशी ।।३।।**
**म्हणवा हरिचे दास । तुका म्हणे मज हे आस ।।४।।'**

स्वतःचा क्षत्रिय धर्म न सोडता, हरिदास वृत्तीने राज्यव्यवहार करावा अशी आस, संत तुकोबाराय व्यक्त करतात. त्यांनी वैश्विक रामराष्ट्राचा, राजधर्म शिवरायांना उपदेशित केला.

**'राजा करी तैसे दाम । तेही चाम चालती ।।१।।**
**कारण ते सत्ता शिरी । कोण करी अव्हेर ।।२।।**
**वाहिले ते सुने खांदी । चाळी पदे बैसविले ।।३।।**
**तुका म्हणे विश्वंभरे । करुणाकरे रक्षीले ।।४।।'**

राजाची सत्ता सार्वभौम असते म्हणून राजाने हरिदासपणाने सत्ता चालवावी. म्हणजे सर्वकल्याणात्मक स्थितिगती निर्माण होईल. अन्यथा, राजाचे कुत्रेसुद्धा शिरसावंद्य म्हणून, प्रजा नाईलाजाने वंदन करते. राजाने हे लक्षात ठेवले पाहिजे, 'राजा सर्व हरी । तेथे दुजा कोण वारी ।' राजा हाच विष्णू होय. तोच अवघ्या रयतेची दुरिते नाहीशी करणारा असतो. म्हणूनच राजा समर्थ, आदर्श आणि कार्यक्षम असायला हवा. त्यासाठी त्याने, रामदासपण अंगिकारले पाहिजे. म्हणजे प्रजाही रामदासपणाने व्यवहार करील, अर्थात कर्तव्यतत्परतेने निरपेक्ष प्रेमपूर्वक सत्ताव्यवहार सांभाळला जाईल. हे वैश्विक रामराष्ट्र कसे असावे, याचा थेट उपदेश संत तुकोबाराय प्रभू रामचंद्रांचा आदर्श शिवरायांपुढे उभा करून सांगतात.



डॉ. रामकृष्णदास लहवितकर महाराज यांनी, अभंग सोडवून या गोष्टीचे वर्णन केले आहे. 'श्री तुकाराम महाराज म्हणतात, आमचा राजा राम आहे. राज्यदेखील राम आहे. प्रजा राम आहे. लोकाधिकारीदेखील रामच आहे. अर्थात सर्व काही रामच आहे. रामावाचून दुसरे काही नाही. माझ्या वाणीतून 'राम' या मंगलकारक शब्दावाचून दुसरे काहीही बाहेर पडत नाही. त्यामुळे 'माझी वाणी अखंड मंगळाची खाणी' आणि राशी झाली आहे. स्वामीचे ठिकाणी सेवेचे स्थान मोडून गेले आहे. कारण ऐक्यामुळे (अद्वैत भावाने) स्वामी-सेवक भाव राहिलेला नाही. अवघे जगच देवाने भरून गेले आहे. कोठेही भेद राहिलेला नाही. त्यामुळे देवाचे नाम गावे एवढेच उरले आहे.' राजा 'लोकपाल' असावा. लोक ही 'राम'स्वरूप होतील असे राज्य करावे. म्हणजे प्रत्येक माणसाच्या मनात अर्थात राजा, सेवक, सैनिक, प्रजा या सर्वांच्या मनात 'राम' तत्त्वाचे जागरण झाले की विश्वच विश्वंभराने अर्थात 'राम' स्वरूपाने भरले असल्याचा अनुभव येईल. अवघे कल्याणप्रदच होईल. हा वैश्विक 'रामराष्ट्र' वर्णन करणारा जगद्गुरू संत तुकोबारायांचा अभंग असा,

**'रामराज्य राम प्रजालोकपाल । एकचि सकल दुजे नाही ।।१।।**
**मंगळा वाचून उमटेना वाणी । अखंडची खाणी एकी रासी ।।२।।**
**मोडेल हे स्वामी ठायठायसेवा । वाढवावा हेवा कोणा संगे ।।३।।**
**तुका म्हणे अवघे दुमदुमले देवे । उरले ते गावें हेचि आंता ।।४।।'**

राजा, राज्य, प्रजा सारेच, 'राम' स्वरूप झाले; लौकिकातील परस्पर व्यवहारातील, सर्व दुरिते अर्थात सत्तालोलुपता, स्वार्थ, शोषकता, हेवेदावे, नाहीसे होतील. अवघा व्यवहार सर्वाभूती राम भावनेने घडेल. म्हणजेच अद्वैत भावाने घडेल. सर्व लोक ठायीच राम भावाने कर्तव्यतत्पर होतील. आपसुकच कल्याणप्रदला अर्थात सच्चिदानंदस्वरूपता हेच मानवजीवन होईल.

यासाठी राजासह प्रत्येकाने रामदासपण स्वीकारून रामस्वरूपाने व्यवहार करावा. अवघा मानव राम असा भाव प्रकटावा. असे राष्ट्र निर्माण करावे असा उपदेश संत तुकोबाराय शिवरायांना करतात. शिवराय या 'राम' वृत्तीने राष्ट्र घडवितात. प्रत्येक मावळा शिवराय होतो. प्रजा, हे श्रींचे, अर्थात शिवरायांचे, अर्थात माझे राज्य आहे; म्हणून व्यवहार करू लागते. समत्वाचे वैश्विक रामराष्ट्र, 'हिंदवी स्वराज्य' म्हणून, शिवराय प्रकटवितात. याच वैश्विक रामराष्ट्राचे अंतरबाह्य स्वरूप समजावून घेऊन; तंतोतंत त्याप्रमाणे राष्ट्र उभे करावे यासाठी, संत समर्थ स्वामी रामदास यांच्याकडून मार्गदर्शन घ्यावे असे जगद्गुरू संत तुकोबाराय सुचवितात.

संत तुकोबाराय केवळ उपदेश करून थांबले नाहीत. वैश्विक रामराष्ट्राचे जागरण करण्यासाठी तुकोबारायांनी जनसागरात आकांत मांडला आहे. पाचशाह्या आणि दिल्लीची सत्ता यांच्या सततच्या युद्धसदृश्य संघर्षामुळे सत्ता स्पर्धेमुळे आणि साम्राज्यवादी शोषक वृत्तीने, अवघी प्रजा स्वत्व विसरली होती. 'बुडती हे जन । न देखवे डोळां ।।' या जाणिवेने, संत तुकोबारांनी, 'भले तरी देऊ कासेची लंगोटी। नाठाळाचे माथी सोटा देऊ ।।' अशी रामवृत्ती स्वीकारली. जणू भगवान विष्णूंनी आपल्याच प्रजेला ताळ्यावर आणण्यासाठी सुदर्शन हाती घेतले.

जगद्गुरू संत तुकोबारायांनी 'ऐसि कळवळ्याची जाती । करि लाभावीण प्रिती ।।' असे म्हणत; नुसते गोंजारणे केले नाही. अतिशय कठोर शब्दात प्रबोध करून; जनताजनार्दनातून, हरवलेला 'राम' पुन्हा प्रस्थापित करण्याचा चंग बांधला. छत्रपती शिवरायांना जनताजनार्दनाचे सात्त्विक बळ मिळावे; त्यासाठी अध्यात्मिक चळवळीला बळ दिले. 'आम्ही वैकुंठवासी । आलो याच कारणासी । बोलले जे ऋषी । साच भावे वर्तया ।।' ऋषींनी वेदांतून प्रसिद्ध केलेला वेदांत अर्थात समत्व योग अर्थात 'राम' तत्त्व अर्थात सर्वांभूती राम अर्थात विष्णू अशी मने घडविण्यासाठी लोकशिक्षकाची वृत्ती धारण केली.



त्यामुळेच हे श्रींचे राज्य उभविता आले. परकियांच्या आक्रमक आणि शोषक सत्तालोलुपतेने, नागवला गेलेला, संसारप्रपंचात अर्थात आपापल्या व्यवसाय, वृत्ती आणि व्यवहाराच्या ठायी, पूर्ण हतवीर्य झालेला समाज, 'रामदास' बनविण्याचे कार्य तुकोबांनी हाती घेतले. भागवत धर्म परंपरेला, जे रामकृष्णहरि स्वरूप लोकमन अर्थात वैश्विक रामराष्ट्र घडवायचे होते. ते पराकाष्ठा करून; जगद्गुरू तुकोबारायांनी घडविले. अवघे प्रापंचिक कामकरी, कष्टकरी, शेतकरी, सेवेकरी, पुजारी सारे लोक रामकृष्णहरिचे दास, पंढरीचे वारकरीही झाले. त्याच रामकृष्णहरि भावनेने छत्रपती शिवरायांचे धारकरीही झाले.

असा जनताजनार्दन जागवून भागवत धर्माचा कळस तुकोबांनी स्थापित झाला. कलियुगातील रामस्वरूप छत्रपती शिवराय आदर्श राजपुरुष म्हणून प्रकटले ते अशा राष्ट्रयोगाचे मार्गदर्शन करणाऱ्या सद्गुरूंच्या अनुग्रहाने.

## (३०)

वैश्विक रामराष्ट्र निर्माण व्हायचे असेल तर; 'राम' मनाची माणसे आणि 'राम' मनाचे शास्ते, निर्माण व्हावे लागतात. राष्ट्र ही मानसिक अवस्था आहे. वैश्विक रामराष्ट्र, ही मानसिक अवस्था म्हणजे, सर्वाभूती राम ह्या आत्मियतेने प्रत्येक माणूस 'राम' तत्त्वाशी अद्वैत होण्याची प्रक्रिया होय. भारतीय परंपरेत अध्यात्म हा मानवी अस्तित्वाचा अर्थात मानवी राष्ट्राचा आत्मा होय. अध्यात्म म्हणजे अद्वैत अनुभूती. सनातन हिंदूधर्मप्रणालीने, वेदांत प्रणित प्रणाली व्यवस्था अंगिकारली. सनातन हिंदूधर्मराष्ट्र हे या अद्वैत प्रणालीवर उभे आहे. अद्वैत प्रणालीचे वर्णन जगद्गुरू संत तुकोबारायांनी 'विष्णूमय जग । वैष्णवांचा धर्म । भेदाभेद भ्रम अमंगळ । कोणाही जीवाचा न घडी मत्सर । वर्म सर्वेश्वर पूजनाचे ।।' या अभंगात केले आहे. हे विष्णूतत्त्व म्हणजेच 'राम'तत्त्व

होय. 'राम'तत्त्व मनुष्यमात्रात ठायीच स्वरूपाने प्रकटले की आपसुकच वैश्विक रामराष्ट्र निर्माण होते. अर्थात सनातन हिंदूधर्मराष्ट्र निर्माण होते. अशा वैश्विक रामराष्ट्राची स्थिरता आणि विकास 'राम'स्वरूप झालेल्या शास्त्यांच्यावर अवलंबून असतो. असे शास्ते अर्थात राजव्यवस्थेशी जोडलेले असतात. राजव्यवस्था ही लोक आणि लोकचे वसतिस्थान भूमी याशी निगडित असते. मात्र तत्त्वतः अखिल मानमात्राचा विचार अशा राजव्यवस्थेकडून होतो. या कल्पनेतील वैश्विक रामराष्ट्र सनातन हिंदूधर्मराष्ट्र म्हणजेच भारत राष्ट्र होय.

ही राष्ट्र कल्पना विश्वंभर स्वरूपाची म्हणजे वैश्विक राष्ट्राची आहे. 'अद्वैत' सिद्धांत हा परमात्मा आणि सृष्टी यांतील पूर्णाद्वाचा सिद्धांत आहे. या परमात्म्याला राम, कृष्ण, हरि, नारायण, विष्णू, विठ्ठल या आणि अशा नावांच्या असंख्य पर्यायांनी ओळखले जाते. हेच आद्यस्वसंवेद्य आत्मरूप होय. हे प्रत्येकाच्या ठायी जीवात्म्याच्या रूपात असते आणि त्याची स्वसंवेद्यता मनाच्या ठायी जाणवते. वैश्विक राष्ट्राच्या सिद्धतेसाठी मन हे रामस्वरूप झाले पाहिजे. असे व्यक्ती आणि समूहाच्या ठायी 'राम' तत्त्व मनोस्वरूपाने प्रकटले की रामराष्ट्र प्रकटते. वैश्विक रामराष्ट्राचे निर्माण, हेच रामराज्याचे कारण असते; तर रामराज्य हेच वैश्विक रामराष्ट्र निर्माणाचे प्रेरक असते. म्हणजे वैश्विक रामराष्ट्र निर्मिती, अर्थात सनातन हिंदूधर्मराष्ट्र निर्मिती ही मन आणि व्यवहारप्रणाली या दोहोंच्या परस्परावलंबी आहे.

यासाठीच सनातनपणाने मने आणि शास्ते घडविण्याची तपश्चर्या युगायुगात घडते आहे. जगद्गुरू संत तुकाराम महाराज आणि संत समर्थ स्वामी रामदास यांचा खटाटोप हा या वैश्विक रामराष्ट्रासाठी आहे. त्यांनी मनबोधाच्या स्वरूपात मने 'राम' तत्त्वाने स्वरूपसिद्ध करणे आणि शास्तेही 'राम'तत्त्वाने स्वरूपसिद्ध करणे यासाठी अनुष्ठान मांडले. जगद्गुरू संत तुकारामांनी भागवत संप्रदायाच्या माध्यमातून हे कार्य हाती घेतले; तर संत समर्थ स्वामी रामदासांनी प्रभूरामांचा आदर्श उभा करीत प्रत्यक्ष प्रयोगशाळांमधून हे कार्य हाती घेतले.



या संत द्वयांना, शास्त्याचे विभूतिमत्त्व, जिजाऊपुत्र शिवरायांमध्ये दिसले. म्हणूनच शिवरायांनाही उपदेश करण्याचे ऋषीकार्य या संतद्वयांनी केले.

कलियुगात श्रीराम, कृष्ण व धर्म यांच्या समान शास्ता प्रकटला तो छत्रपती शिवरायांच्या रूपाने! या प्रक्रियेचा स्पष्ट उद्‌गार आणि प्रबोध जसा जगद्गुरू तुकोबारायांनी केला; किंबहुना त्याही पेक्षा अधिक स्पष्ट आणि प्रात्यक्षिकासह, युद्धप्रसंगाला सिद्ध व्हावे त्या प्रकाराने, हा उद्‌गार, संत समर्थ रामदास स्वामींनी केला आहे.

## (३१)

संत समर्थ रामदास स्वामींनी छत्रपती शिवरायांना थेट रामराष्ट्र उभारण्याचा उपदेश केला. शिवरायांचा गौरव करण्यासाठी लिहिलेल्या पत्रात समर्थ लिहितात,

**'या भूमंडळाचे ठायीं । धर्म रक्षी ऐसा नाही ।
महाराष्ट्र धर्म राहिला कांहीं । तुम्हा करिता ।''**

त्या पुढे जाऊन 'क्षात्रधर्म' सांगतांना समर्थ उपदेश करतात,

**'मराठा तितुका मेळवावा । महाराष्ट्र धर्म वाढवावा । येविसीं न करितां तकवा । पूर्वज हांसती ।।''**

या उपदेशाचा अर्थ छत्रपती शिवरायांना आणि त्यांच्या समग्र परिवाराला उमगला. मात्र तथाकथित महाराष्ट्र राज्य आणि मराठी प्रेमींना आत्मपरीक्षण करणे आवश्यक वाटते. या उपदेशातील पहिल्या चरणात, 'या भूमंडळाचे ठायी' असा उल्लेख आहे तो केवळ राज्यवाचक नाही

तर; जग अर्थात पृथ्वीवाचक आहे, हे लक्षातच घेतले जात नाही. सनातन हिंदू धर्म विचारांमध्ये सर्वत्र वैश्विक भूमिकेने तत्त्वविवेचन केले आहे हे लक्षात घेणे आवश्यक आहे. या पृथ्वीवर 'राम, कृष्णां'प्रमाणे धर्मरक्षण करील अर्थात समत्व धर्माने रक्षण करील अर्थात वेदान्नप्रणित, सर्वाभूती राम अनुभवत, वर्तनप्रणाली अवलंबिणे असा धर्म रक्षण करील; असा कोणी राहिला नाही. धर्मविनाश होणाऱ्या अशा परिस्थितीमध्ये, 'महाराष्ट्रधर्म राहिला काही । तुम्हाकरितां ॥' या चरणांचा तर पूर्ण विपर्यास करूनच; आम्ही तथाकथित अभिमानी बोलत असतो. भारतीय संतांनी अपवादानेसुद्धा संकुचित प्रदेशाचा धर्म असा उल्लेख केलेला नाही. संत रामदासांनीही केवळ कोकण, देश, विदर्भ, मराठवाडा इ. पुरता महाराष्ट्र असा उल्लेख केला नाही; हे आम्ही कधीतरी समजावून घेऊयाना. 'महाराष्ट्रधर्म' म्हणजे महान-राष्ट्रधर्म अर्थात वैश्विक राष्ट्रधर्म होय. याचा स्पष्ट अर्थ असा; सर्वाभूती परमेश्वर, असा अनुभव मनुष्यमात्राच्या ठायी जागविणारा धर्म होय. हा सर्वांभूती राम अनुभूत करणारा धर्म, ज्या थोड्याफार माणसांच्या ठायी अद्याप शिल्लक आहे. त्या माणसांचा उपयोग, तुम्ही (शिवरायांनी) स्वराज्य अर्थात वैश्विक रामराष्ट्र उभारण्यासाठी करावा; असे स्वामी समर्थ रामदास सांगत आहेत.

दुसऱ्या उपदेशातील 'मराठा तितुका मेळवावा ।' हा उल्लेख मराठा असा जातीवाचक नाही. महाराष्ट्र आणि मराठा शब्दांच्या उत्पत्ती शास्त्राने हे सिद्ध केले आहे. मराठा हा शब्द महारथी या शब्दातून प्रकटला आहे. महारथी म्हणजे विशेष युद्धनैपुण्य असलेला शक्तिमान योद्धा. वैश्विक रामराष्ट्र उभारणीच्या संदर्भाने विचार करायचा तर; रामस्वरूप होऊन, रामस्वरूप अशा राज्यव्यवस्थेच्या रक्षणासाठी, सिद्ध असलेला योद्धा; असाच अर्थ प्रतीत होतो. महान राष्ट्र निर्माण करण्यासाठी समर्पण आणि सेवाभावाने, 'राम'तत्त्वाचा विनाश करू पाहाणाराशी, निकराने झुंज देणारा योद्धा असाच अर्थ घ्यावा लागतो. छत्रपतींनी गोळा केलेला प्रत्येक योद्धा असा मराठा होता! असा जो जो म्हणून 'राम' स्वरूपाने सिद्ध झालेला असेल, तो तो माणूस जोडावा आणि त्यासाठी प्रयत्न करावा; तो महाराष्ट्रधर्म वाढविण्याचा! म्हणजेच 'राम'तत्त्वाने सिद्धवर्तनशैलीचा प्रचार करण्याचा प्रयत्न करावा, या प्रबोधनकार्यात थोडीही कुचराई होता कामा नये. अन्यथा मानवी वंशातील राम, कृष्ण आणि धर्मराज आणि तत्सम हासतील; असा इशाराही संत रामदास देऊन टाकतात.

या सर्वाचा अर्थ असा की, राम कृष्ण धर्मराज यांचा आदर्श आणि समदृष्टीचे वेदान्न तत्त्वज्ञान यांचा जागर माणसा-माणसात निकराने करून; सर्वाभूती परमेश्वर या न्यायाने सर्वात्मक कल्याणकारी असे राष्ट्र तथा राज्यनिर्मितीसाठी प्रयत्न करावा. त्यासाठी आज जे 'राम' मनाने वावरतात असे थोडेफार राहिलेले लोक गोळा करावेत. त्यांच्या आधारे अशी 'राम' मने निर्माण करीत, महान राष्ट्रधर्माने सर्वकल्याणकारी राज्य स्थापनेची तयारी करण्याचा विचार करावा.

स्वामी समर्थ रामदासांना असा दृढ निश्चय करणारा सात्त्विक योद्धा सापडला तो छत्रपती शिवरायांच्या रूपाने! या पुरुषाला संत समर्थ रामदास पत्र लिहिताना त्याच्यातील 'राम'तत्त्व आणखी प्रखरतेने प्रकट करण्याचा प्रयत्न करतात-

**'निश्चयाचा महामेरू । बहुत जनांसी आधारू । अखंड स्थितीचा निर्धारू । श्रीमंत योगी ॥**
**यशवंत कीर्तिवंत । सामर्थ्यवंत वरदवंत । पुण्यवंत नीतिवंत । जाणता राजा ॥'**

जणू संत समर्थ रामदास स्वामी प्रभूरामचंद्रांचेच वर्णन करीत; शिवरायांना गौरवित आहेत.

## (३२)

'महाराष्ट्रधर्म' अर्थात महान राष्ट्रधर्म आणि 'मराठा' तसेच राम दासांना सापडलेला वैश्विक रामराष्ट्रासाठीचा आदर्श शास्ता समजावून घेण्यासाठी; 'श्री शिवछत्रपती – समर्थ योग' या श्री रामानंदस्वामी संस्थान, सज्जनगडने प्रसिद्ध केलेल्या संपादित ग्रंथातील; १९०८ रोजी २६ फेब्रुवारी दासनवमीला सोलापूर येथे झालेल्या लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या व्याख्यानातील धर्मविषय आणि रामदासवृत्ती अर्थात वैश्विक रामराष्ट्र विषयक विचार महत्त्वाचे वाटतात. वेदांत व्यवहारात कसा उतरवावा; ते रामदासांनी शिकविले, असे लोकमान्यांना सांगावयाचे आहे. 'परित्राणाय साधूनां विनाशय च दुष्कृताम् । धर्मसंस्थापनार्थाय सम्भवामि युगे युगे ।' असे प्रत्यक्ष परमेश्वराने सांगितले. 'आमची कर्मे आम्ही बरोबर करीत असता, आमच्या हातून कोणताही अपराध झाला नसता. आमच्यावर येणाऱ्या विपत्ती काढून टाकण्याकरिता; परमेश्वर अवतार घेत असतो, यासंबंधी आमची खात्री आहे.' 'वसुधैव कुटुंबकम्' हे तत्त्व धर्म शिकवितो, 'जुने रामदास स्वामींचे ग्रंथ वाचल्यास, राष्ट्र ही कल्पना, मनुष्य जन्मतःच स्वतंत्र व ते सर्व सारखे आहेत असे प्रतिपादिलेले आहे, हे समजून येईल.' 'पहिल्याने रामदासांनी हिंदू धर्माचे पुनरुज्जीवन केले. भक्तिरूप मार्गात जातीचा भेद नाही, हे रामदासांनी शिकविले. रामाचा किंवा पंढरीचा भक्त योगीही होऊ शकतो. या धर्मात असेही तत्त्व आहे की, ज्याला मोक्षप्राप्ती पाहिजे असेल त्यास आपल्या देशबांधवांची काळजी केल्याखेरीज गत्यंतर नाही. देश आणि देव हे दोन मानणारे जे लोक आहेत, ते सर्वप्रकारे धर्मभ्रष्ट आहेत, असे मी समजतो. उदात्त विचार विकसित करून संसारातून वर येऊन ईश्वरप्राप्ती करून घ्यावयाची आहे. असे धर्माचे तत्त्व आहे. मनुष्याचा परमेश्वर होऊ शकतो. आज जन्मलेल्या हजारो लोकांचा व माझा आत्मा भिन्न नाही. सगळ्या मनुष्यांचा आत्मा एक आहे. मी तो आहे. हे नाते ओळखणारा अधिक तत्त्वज्ञ व देशाचा हितकर्ता आहे असे म्हणण्यास हरकत नाही. वेदांताची ही तत्त्वे व्यवहारात कशी लावायची हे जर कोणी शिकविले असेल तर ते श्रीरामदासांनी!' 'घराबाहेरची स्थिती न बघणे अशा प्रकारची बुद्धी उत्पन्न करणे म्हणजे राष्ट्रनाशाकडे नेणे! राष्ट्र जिवंत करण्याची वेळ येते, तेव्हा या तत्त्वांची ओळख करून द्यावी लागते', 'आत्मा, तुम्ही व देश उद्धरावयास लागणारी शक्ती तुमच्या जवळ आहे, निश्चय पाहिजे', 'महाराष्ट्राच्या संसारापासून (महान राष्ट्राच्या – राम राष्ट्राच्या) ते अलिप्त नव्हते. याकामी आपणास मनोनिग्रह करावा लागतो व तो धर्माचरणाच्या खेरीज होत नाही. योगामुळे मन ताब्यात कसे आणावे ते कळते.' 'वेदातही हे सांगितले आहे. मन एव मनुष्याणां कारणं बंधमोक्षयोः।' 'मने तयार होतील तर स्वातंत्र्य तुमच्याजवळ ठेवलेले आहे.', 'रामदासांनी राष्ट्राची मने तयार करण्याचे काम केले.' 'धार्मिक व राजकीय उत्सव हे आपणास विभक्त करता येणार नाहीत. धर्माची मदत घेऊन मने तयार करून, खऱ्या वेदांताची ओळख करून देऊन, लोकांना संकटातून पार पाडण्याचे काम महाराष्ट्रात झालेले आहे. पुढे रामदास होतील, पण तोपर्यंत आपण आपल्या सामर्थ्याप्रमाणे मदगुराप्रमाणे आपापले काम करण्याच्या उद्योगास लागले पाहिजे.' 'बायकापोरांच्या ऐवजी देशाचा संसार करण्याची बुद्धी होणे त्या बुद्धीचा विकास आहे. त्याच्या पुढची पायरी मानवजात कशी संतुष्ट करायची व त्याच्यापुढे ईश्वर आहे. आपणास हे सोडून चालणार नाही.' 'आपल्याला रामदासी म्हणून जो अत्युच्च कल्पनेने, हेतूने उच्च साध्याकरिता कार्य करण्यास प्रवृत्त झाला नाही, त्याने रामदासांची थट्टा केली असे समजावे.' 'रामदास स्वामी यांनी दासबोध लिहिला व तो खरा समजला तर एकट्या शिवाजीला समजला. रामदासांनी महाराष्ट्रात जागृती केली म्हणजे लोकांना गंध लावायला शिकविले असा अर्थ नाही. तुकारामांना हा अर्थ अभिप्रेत नव्हता. उच्च कल्पना, अत्युच्च कल्पना लोकांस शिकवून त्यांच्या हातात खेळू देणे – जातीजातीतील भेद नाहीसे करून; आपण सारे एकच आहोत असे

वाटावयास लावणे, हे खरे धर्मशिक्षण आहे.' 'राष्ट्राबद्दल स्वदेशाबद्दल प्रीती उत्पन्न करणे म्हणजे संसाराची प्रीती कमी करणे आहे. ही पायरी झाल्याशिवाय – मधली ही पायरी ओलांडल्याशिवाय – परमेश्वर होता येत नाही.' लोकमान्य टिळकांच्या भाषणातील वर उल्लेखित मोजक्या अंशातून संत समर्थ स्वामी रामदास यांच्या, महाराष्ट्रधर्म मराठा, देश, यांतील कल्पनांमधील व्यापकत्व लक्षात येते. या व्यापकतेने रामदासांनी शिवरायांच्या मनातील रामराष्ट्राचे जागरण केले.

लोकमान्यांनी 'महाराष्ट्रधर्म' कल्पनेची व्यापकता या भाषणात पुढीलपणाने स्पष्ट केली आहे. स्वातंत्र्य चळवळीच्या निमित्ताने त्यांचे विचार प्रकट झालेले असले तरी वैश्विक रामराष्ट्र, राम आणि रामदासपण ही कल्पना उलगडणारे आहे. ते म्हणतात, 'रामदासांच्या वेळेसारखी हल्लीची वेळ आहे आणि त्यांच्या प्रयत्नांसारखे प्रयत्न हल्ली झाले पाहिजे. धर्माची – नव्हे महाराष्ट्रधर्माची – महा म्हणजे मोठ्या राष्ट्राच्या म्हणजे साऱ्या हिंदुस्थानच्या धर्माची स्थापना व्हावयास पाहिजे आहे. देशाची उन्नती व्हावी, राष्ट्राची उन्नती व्हावी, बंधुत्वाची उन्नती व्हावी व आत्मा या पायऱ्यांतून जाऊन मुक्त व्हावा, असे झाले पाहिजे. तरुण पिढीपैकी कित्येक तरुण जर सर्व देशभर रामदासांच्या अनुयायांसारखे संचार करून देशकार्य करावयास पुढे येतील तर, या उत्सवाचा उपयोग झाला.' लोकमान्यांच्या या प्रतिपादनातून व्यष्टीपासून समष्टीपर्यंत रामदासपणाने 'राम' जागवून वैश्विक रामराष्ट्र उभारले जाईल; ही स्वामी समर्थ रामदासांच्या मनातील वैश्विक रामराष्ट्राची संकल्पना अखंड भारतीयांच्या संदर्भाने अर्थात सनातन हिंदूधर्मराष्ट्राच्या संदर्भाने उलगडली गेली आहे.



## (३३)

संत समर्थ रामदास स्वामींनी त्रेतायुगातील प्रभूरामचंद्र स्वरूपातील, विश्वधारणा करणारा भगवान विष्णू, हा वैश्विक रामराष्ट्र उभविणारा शास्ता म्हणून, आदर्श पुरुष डोळ्यासमोर ठेवला. असा आदर्श पुरुष माणसात प्रकट होतांना, त्या व्यक्तीला देखील सत्यनिष्ठ, प्रेममय, कारुण्यपूर्ण अशा रामदासपणाच्या वर्तनशैलीचा अभ्यास करावा लागतो. रामदासपण म्हणजे, शिवस्वरूपाने भगवद्‌भक्ती करणे होय. असे रामदासपण, ह्या विभूतिमत्त्वाच्या ठायी प्रकटण्याचा अनुभव, जनसामान्य घेऊ लागले की, मनुष्यमात्र रामदासपणाने एकवटण्याची प्रक्रिया सुरू होते असे, समस्त मनुष्यमात्रातील रामदासपण अर्थात शिवत्व प्रकटले, अर्थात, सर्वाभूती एकच रामतत्त्व आहे याची अनुभूती येऊ लागली की जनताजनार्दनपणे उन्नत होते अर्थात वैश्विक एकात्मभाव अर्थात वेदांत प्रकटतो. विराट अशा सर्वकल्याणात्मक रामराष्ट्राचे विश्वात्मक दर्शन घडते.

यासाठी व्यक्ती, कुटुंब, ग्राम, परिसर, प्रदेश, व्यापक देश आणि विश्व अशा प्रत्येक पायरीवर 'राम' प्रकट झाला पाहिजे. वेदान्न, नसानसात, मुळात परंपरेने वाहात आहे, अशा समाज म्हणजे सनातन भारतीय अर्थात वेदांत प्रणित सनातन हिंदूधर्मसारणीने किंवा प्रणालीने, जीवनधारणा असणारा एकात्म मनोभावी समाज, या भारतराष्ट्र पायरीवर एकवटला पाहिजे. वैश्विक 'राम'राष्ट्राचे उदात्त ध्येय, प्रकटले आहे असा किमान प्रदेश म्हणून; महाराष्ट्र देश रामराष्ट्र म्हणून प्रकटावा. महाराष्ट्रधर्म जागरणाने सनातन हिंदूराष्ट्रधर्माचे जागरण करण्यासाठी प्रत्येक तरुण रामदास बनावा अशी प्रक्रिया, संत समर्थ स्वामी रामदासांनी डोळ्यासमोर ठेवली. ह्या प्रक्रियेच्या मार्गातील एक एक पायरी या दृष्टीने छत्रपती शिवरायांचे विभूतिमत्त्व त्यांना प्रभू रामचंद्र स्वरूपाने अवगत झाले.

(३४)

या प्रक्रियेतील पहिली पायरी रामविभूतिमत्त्वाचे निःस्सीम भक्तिपूर्वक जागरण होय. 'एकवीस समासी अर्थात जुना दासबोध' या ग्रंथात पंधराव्या समासात 'श्री रघुनाथ चरित्र' या उल्लेखात स्वामींनी 'राम' विभूतिमत्त्वाचे दर्शन घडविले आहे. समर्थव्रती सुनील चिंचोळकर संपादित आणि गंधर्ववेद प्रकाशन पुणे प्रकाशित; या ग्रंथातील, पंधराव्या समासात, पहिल्या अठरा ओव्यांमध्ये श्रीरामाच्या सगुण रूपाचे भावपूर्ण वर्णन आहे. भागवत संतांनी श्रीविठ्ठलाचे जसे वर्णन केले आहे, तसेच हे वर्णन भक्तिभाव जागृत करण्यासाठी उपयोगी ठरते. त्यातील पहिल्या ओवीत,

**'निमासुर सुहास्यवदन । माणिक्य किळा झळकती दशन । अधर सुरंग बोलतां नीउन्य । उपमा प्रबाळाची ।।१।।'**

स्वयंप्रकाशी अशा सुंदर मुखचंद्राचे वर्णन केले आहे.

पुढील एकोणीस ते चोवीस ओव्यात प्रभूरामचंद्रांच्या गुणांचे वर्णन केले आहे.

**'राम सर्वांगे सुंदरू । राम करुणेचा सागरू । दीन अनाथांचा उद्धारू । येत श्रीराम कर्ता ।।१९।।**
**वैभव प्रपंची वेचावें । आणि अंतीं रामासी स्मरावें । रामें तयासी सांभाळावें कृपाळुपणें ।।२०।।**
**प्राणी क्षीण जाला देहीं । वेढिला येमदूतीं तेहीं । तेव्हा सोडविता नाहीं । येका श्रीरामा वाचुनी ।।२१।।**
**जेधवा वैभवहीण व्हावें । जीवलगीं वोसंडावे । ते समयी आपंगावे । कृपाळुपणें राघवें ।।२२।।**
**रामासी कोण्ही च स्मरेना । परी राम माझा विसंबेना । गुण दोष विचारीना । माये बाप विश्वाचा ।।२३।।**
**राम जीवींचा जिव्हाळा । राम मनींचा कोवळा । राम जाणे अंतर्कळा । निजदासांची ।।२४।।'**

असा मायबापांप्रमाणे प्रजेवर 'लाभीवीण प्रीती करणारा' 'राम' रामदासांनी निर्देशित केला आहे.

पुढील पाच ओव्यांमध्ये रामांच्या कार्याचे साक्षेपी वर्णन समर्थांनी केले आहे.

**राम पुण्य परायेण । राम लोकत्रयाचा प्राण । रामें दास विभीषण । चिरंजीव अक्षई केला ।।२५।।**
**वैभवे रावण माजले । तेणे सकळ देव गांजिले । ऐसें जाणोनी धावणें केलें । वैकुंठाहुनी रामें ।।२६।।**
**वानरें मिळालीं रामाभोवती । राम वानरांचा सांगाती । धांवधावो जवळी येती । कोण भाग्य तयांचे ।।२७।।**
**रामपायीं अहिल्या शिळा । दिव्यरूप जाली बाळा । रामे गणिकेसी सोहळा । विमानाचा दाखविला ।।२८।।**
**राम खाये भिल्लटीचीं बोरे । रामप्रतापें वानरेश्वरें । राज्य केलें सहोदरें । गांजिला होता जो ।।२९।।**

या ओव्या वाचतांना अन्य अनेक ठिकाणी स्वामींनी रामकार्याचे विवरण केलेले आहे तेही आठवणे स्वाभाविक आहे. 'राम' कार्याने अशक्य ते शक्य होते. 'राम' तत्त्व हे परात्पर तत्त्व आहे. ते जागले की अपार करुणेचा वर्षाव होतो. आपपरच राहात नाही. सर्वांचाच उद्धार होतो.

विश्वात्मक रामराष्ट्र उभे करण्यासाठी, अशा रामस्वरूप शास्त्याचीच आवश्यकता आहे. हेच रामस्वरूप छत्रपतींमध्ये रामदासांना साक्षात्कारित

झाले. म्हणूनच 'श्रीमंत योगी' असा उद्‌गार स्वामींच्या मुखातून स्फ ‌ुट झाला. भक्तीसाठी तद्रूप होण्याचा ध्यास हवा असतो तो राम नामस्मरणाने जागतो. पूर्णाद्वैतयोगही कलियुगात रामनामाने साधता येतो. त्रिताप हरण करण्याचे सामर्थ्य 'राम' नामात आहे. हे राम नाम माहात्म्य तीस ते छत्तीस ओव्यांत मांडले आहे.

**राम सुरवरा कोवसा । राम मंडण सूर्यवंशा । राम जप भवानीशा । सप्रचित राम नाम ।।३०।।**

कुलगोत्र, देवादि सर्वांचं अर्थात मानवमात्रांचे भवतापही नाहीसे करण्याचे सामर्थ्य राम नामात आहे, याची प्रचिती येते.

पुढील सदोतीस ते चव्वेचाळीस ओव्यांत जपविधी सांगितला आहे.

**'वैरें निजध्यास रावणें केला । त्याचा संकल्प त्यासी फळला । मां जेणें दास्यत्वें उपासिला । तो राम कैसा नव्हे ।।४४।।'**

समर्थांना दास्यभक्तीने 'राम' जप करावा अशी अपेक्षा आहे.

पुढील ४५ ते ५१ या ओव्यात साधकाची व्रतस्थता स्पष्ट केली आहे. त्यातील ५० व्या ओवीत रामराष्ट्र निर्मितीसाठीचे दास्यभक्तीरहस्य उद्‌घटित केले आहे.

**'जयासी राम चि व्हावा । तेणें लोकिक सोडावा । राम कैवारी करावा । जो संकटी नुपेक्षी ।।५०।।'**

दास्य कार्याचे प्रदर्शन न करता 'राम' प्राकट्यासाठी सेवारत असावे. तो राम कैवारी आहे. कार्यातील संकटप्रसंगी उपेक्षा करीत



नाही. 'राम' मन ठायीच प्रकटले की उपेक्षेचा प्रश्नच नाही. 'आपली आपण सोडवण' होते.

रामांच्या मनात आत्मियता असतेच. भक्तीने सत्य, प्रेम, करुणा ठायीच प्रकटते. हे बावन्न ते छपन्न ओव्यांत सूचित केले आहे.

**'राम दासासी भिन्नत्व नाहीं । तरी राम होये मी हि । तू त्याचा दास तरी तूं हि । राम चि होसी ।।५४।।'**

असे दास्य घडू लागले की; वैश्विक रामराष्ट्र प्रकट होणारच!

जे केवळ शब्दज्ञानात अर्थात व्यावहारिक भौतिकात अडकतात, त्यांना दैन्यावस्था अटळ असते. त्याकरिता 'राम' तत्त्व अध्यात्म स्तरावर अनुभूत करून घेतले पाहिजे हे कळावे; यासाठी सत्तावन्न ते चौसष्ट ओव्यांत ज्ञानास पारख्या झालेल्यांच्या दैन्यावस्थेचे वर्णन केले आहे. म्हणून हे दैन्य फेडायचे असेल तर 'राम' दास्य साधना करावी म्हणजे

**'बोलता बोलता थारा । मोडे अज्ञानाचा ।।६४।।'**

असे रामदास स्पष्ट करतात.

रामस्वरूप होणे रामदास्य भक्तीचे अंतिम लक्ष्य असते. हे समजावून सांगण्यासाठी राम स्वरूप स्थितीचे उद्‌घाटन पासष्ट ते त्र्याहात्तर या ओव्यांत केले आहे. प्रपंचच सत्य मानून; अर्थात नश्वर तेच शाश्वत मानून प्रपंचात गुंतला तर, परमार्थ अर्थात जीवन सार्थक, अर्थात ठायीच कृतकृत्यतेची अनुभूती, अर्थात सच्चिदानंद रूपाची अनुभवता येणार नाही! त्यांसाठी 'धावणे करा कोण्ही' असे म्हणण्याची पाळी येईल म्हणूनच अंतरी रामदासपण सांभाळले पाहिजे.

चौऱ्याहत्तराव्या अर्थात अखेरच्या ओवीत रामदास होऊन रामस्वरूप व्हावे म्हणजे निजस्वरूप अनुभव येऊन विश्वशांती सुखाची प्रचिती येईल.

अर्थात वैश्विक रामराष्ट्राची प्रचिती येईल आणि वृथा प्रपंचाचा शीण नाहिसा होऊन; विश्रांतपण अनुभवता येईल असे रामदास सांगतात.

**(३५)**

श्री रघुनाथ चरित्राचा स्पष्ट हेतू हाच आहे की, सर्वकल्याणात्मक जीवन अनुभवण्यासाठी अर्थात 'आनंदवनभुवन' अनुभवण्यासाठी रामदासपण जागवणे आवश्यक आहे. ह्या रामदासपणाचा आदर्श म्हणून स्वामी समर्थ, रामभक्त हनुमान सर्वांच्या डोळ्यापुढे उभा करतात. हा हनुमान, श्री रामरक्षा स्तोत्रातील 'मनोजवं मारुततुल्यवेगं । जितेंद्रियं बुद्धिमत्ता वरिष्ठम् । वातात्मजं वानरयुथमुख्यं । श्रीरामदूतं शरणं प्रपद्ये ।।३३।। यांतील वर्णनाप्रमाणे 'जितेंद्रियं बुद्धिमतां वरिष्ठम' असा प्रकट होणे अभिप्रेत आहे. म्हणजे भक्ती, ज्ञान, वैराग्य अशा साधनेने सिद्ध झालेला हवा आहे. तसेच तो 'वानरयुथमुख्यम्' हवा आहे. म्हणजे समूहमनानेही भक्ती, ज्ञान, वैराग्य साधना करणाऱ्या साधक समूहांचा मुख्य हवा आहे. भक्ती, ज्ञान, वैराग्य पूर्ण होऊन 'राम' तत्त्वाने वैश्विक रामराष्ट्र प्राकट्याचा ध्यास घेतलेले, रामदास ठायी ठायीच नव्हे; तर मनुष्यमात्रांच्या ठायी रामदास निर्माण होण्यासाठी, शारीर चापल्य शक्ती असलेले आणि 'मनोजवं मारुततुल्य वेगं' असे तरुण निर्माण करण्यासाठी, अर्थात शारीर आणि मानसिक स्तरावर, शक्तिमान अर्थात वायुपुत्र म्हणजे 'वातात्मजम्' अर्थात ॐकार स्वरूप अर्थात शिवस्वरूप अर्थात प्राणस्वरूप, (प्राण हे वायूचे एक रूप आणि शिव हेही वायुस्वरूप) जागविण्याचा प्रयत्न, श्री स्वामी समर्थ रामदास करतात.

**(३६)**

हनुमान भक्ती अर्थात 'रामदास भक्ती'ने रामभक्तीचा पर्याय स्वामी रामदासांनी निवडला. राम आणि हनुमान यांचे अद्वैत हे ध्येय या साधनेला दिले. तसेच दास्यभक्तीचे परिमाण दिले. असे रामदास निर्माण करण्यासाठी, सगुणस्वरूपातील हनुमानांची मंदिरे, ठायी ठायी नव्याने निर्माण केली. जुन्या मंदिरांना परिमाण दिले. ग्रामवेस ही मारुतीवेस झाली. संपूर्ण गावाचे बोधचिन्ह रामभक्त हनुमान झाले. ग्रामस्थांचे ग्रामदैवत हनुमान आहे.

हा पर्याय मनुष्यमात्राला 'राम' बनविण्यासाठी अतिमहत्त्वाचा ठरला. गावच्या वेशीवर हनुमान आणि परस्परांच्या भेटीचा परवळ 'राम राम' हे विधिविधान जीवनशैलीला दिले. गावागावात, हनुमानांच्या भक्तीने शक्तीची उपासना आणि भक्तीची दृढता वाढू लागली. हनुमान व्हावे आणि स्वतःचे संकट स्वतःच निवारण करावे; असा रामस्वरूप तरुण प्रकट झाला.

या तरुणांसमोर छत्रपती शिवरायांच्या रूपाने रामदासपण जागविणारा प्रभू राम उभा केला. एक एक तरुण शिवाजीस्वरूप मावळा म्हणून; हनुमानपणाने स्वराज्यनिर्मितीच्या कामास लागला. एकप्रकारे रामस्वरूप रामदास बनविण्याच्या शाळा हनुमान मंदिराच्या रूपाने रामदासांनी उभारल्या. सनातन शारीरसाधनेला, हनुमानांचे परिमाण देण्याचे कार्य रामदासांनी केले. साधनेसाठी आणि आत्मनिर्भरतेसाठी मारुती स्तोत्राची योजना केली.

मारुती स्तोत्राच्या निमित्ताने हनुमानांचे चरित्र आणि विभूतिमत्त्व मनामनावर ठसावले. हनुमानांचे सर्वथा 'राम' सामर्थ्य भवतापहरण करण्याबरोबरच, रामराष्ट्र उभविण्याचे कोदंड बनले. याच बळाने छत्रपती शिवराय, कोदंडधारी प्रभू राम वाटू लागले. श्री रघुनाथ चरित्रातील आशय असा कलियुगातील वैश्विक रामराष्ट्रनायक, शिवछत्रपतींना समोर उभे करतो.

हनुमान स्तोत्र हा एकप्रकारे रामदासपणे प्राकट्याचा मंत्र आहे. मंत्रसामर्थ्य प्रकटल्याने 'हनुमान'स्वरूप हे भौतिक आपदा निवारण करण्यासाठीचे शस्त्र झाले. या हनुमान स्तोत्राच्या पठणाने धन, धान्य,

पुत्र, पौत्र, पशू, वाहन, बल, बुद्धी, सामर्थ्य, साहस, यश, कीर्ती, प्रतिष्ठा, सुख, समृद्धी, रूप, विद्या, कौशल्य यांची प्राप्ती होते. भूत, प्रेत, समंध अशा बाधा, रोग, व्याधी, चिंता, शत्रु व संकटांचे निवारण होते, अशी फलश्रुती समर्थांनी सांगून 'रामरूपी अंतरात्मा दर्शने दोष नासती' असे ठाम आश्वासन अखेरीस दिले आहे.

माणसाला प्रापंचिक अर्थात भौतिक सुखे हवी असतात, परंतु हा सर्व लाभ मनःशांतीशिवाय होत नाही. ही मनःशांती रामभक्तीने ठायी ज्ञान आणि वैराग्य प्राप्तीशिवाय होत नाही. अखेरच्या श्लोकातील आश्वासन हे निर्दोषत्व प्रकटण्यासाठी, रामस्वरूपाचे अंतरात्मा स्वरूपाने दर्शन होऊन एक प्रकारे मारुतीस्वरूपता येण्यासाठी म्हणजेच रामदासपणाचे जागरण होण्यासाठी आहे. असे रामदासांचे जागरण झाले की; अस्तित्वाची सत्यता म्हणजे सर्वाभूती 'राम' तत्त्व, हे ज्ञान प्रकटते. सर्वांविषयी प्रेम तथा कारुण्यभाव प्रकटतो. रामदास अवस्थेचे हेच तर प्रमाण आहे! असे हनुमानस्वरूप अर्थात रामदासपण प्रकटले की; विश्वात्मकतेची जाणीव होते. भोवतीच्या रामदासांची घट्ट वीण होऊन वैश्विक रामराष्ट्र प्रकटते, अशा प्राकट्याचा, राज्यव्यवस्थापनेसाठी उपयोग होतो. प्रभू रामचंद्रांसारखा हनुमानस्वरूप अर्थात 'राम' तत्त्व दास असला की; वैश्विक भावना त्या रामराष्ट्राठायी निर्माण होते. सनातन हिंदूधर्मराष्ट्र अर्थात वैश्विक रामराष्ट्र, अर्थात भारतराष्ट्राची हीच 'राम'तत्त्वीय राष्ट्रभावना आहे. त्यामुळे भारतराष्ट्र हेच वैश्विक रामराष्ट्र म्हणून अनुभूती घडविण्याची पात्रता; प्रत्येक रामदासाच्या ठायी निर्माण होते. याच भावनेने स्वामींनी सगुणोपासनेचे, अर्थात भक्तीचे साधन म्हणून, 'श्री मारुती स्तोत्र' हाती दिले. हे स्तोत्र राष्ट्रनिर्मितीतील दोषांचे, वज्रपणाने निर्दालन करील; असा आत्मविश्वास सर्वांच्या ठायी स्तोत्रपठणाने जागवतो.

या 'श्री मारुती स्तोत्रा'त श्री रघुनाथ चरित्राप्रमाणे सगुणरूप वर्णनाबरोबरच, भक्तिसाधना, हनुमत कार्य तेज आणि सामर्थ्य यांचे वर्णन केले आहे. ते स्तोत्र असे,



# ।। श्री मारुती स्तोत्र ।।

**भीमरूपी महारुद्रा वज्रहनुमान मारुती ।**
**वनारी अंजनीसुता रामदूता प्रभंजना ।।१।।**
**महाबळी प्राणदाता सकळा उठवी बळें ।**
**सौख्यकारी दुःखहारी धूर्त वैष्णव गायका ।।२।।**
**दीनानाथा हरीरूपा सुंदरा जगदंतरा ।**
**पातालदेवताहंता भव्यसिंदूरलेपना ।।३।।**
**लोकनाथा जगन्नाथा प्राणनाथा पुरातना ।**
**पुण्यवंता पुण्यशीला पावना परितोषका ।।४।।**
**ध्वजाग्रें उचली बाहो आवेशें लोटला पुढें ।**
**काळाग्नि काळरुद्राग्नि देखतां कांपती भयें ।।५।।**
**ब्रह्मांडे माइली नेणों आवळे दंतपंगती ।**
**नेत्राग्नि चालिल्या ज्वाला भ्रुकुटी ताठिल्या बळें ।।६।।**
**पुच्छ ते मुरडिलें माथां किरीटी कुंडलें बरीं ।**
**सुवर्ण कटि कांसोटी घंटा किंकिणी नागरा ।।७।।**
**ठकारे पर्वता ऐसा नेटका सडपातळू ।**
**चपळांग पाहतां मोठे महाविद्युल्लतेपरी ।।८।।**
**कोटिच्या कोटि उड्डाणे झेपावे उत्तरेकडे ।**
**मंदाद्रिसारिखा द्रोणू क्रोधें उत्पाटिला बळे ।।९।।**
**आणिला मागुतीं नेला आला गेला मनोगती ।**
**मनासी टाकिलें मागे गतीसी तुळणा नसे ।।१०।।**
**अणूपासोनि ब्रह्मांडा एवढा होत जातसे ।**
**तयासी तुळणा कोठे मेरुमंदार धाकुटे ।।११।।**
**ब्रह्मांडाभोंवतें वेढे वज्रपुच्छें करू शके ।**
**तयासी तुळणा कैची ब्रह्मांडी पाहता नसे ।।१२।।**
**आरक्त देखिले डोळां ग्रासिलें सूर्यमंडळा ।**

**वाढता वाढतां वाढे भेदिलें शून्यमंडळा ।।१३।।**
**धनधान्य पशुवृद्धि पुत्रपौत्र समग्रही ।**
**पावती रूपविद्यादि स्तोत्रपाठें करूनिया ।।१४।।**
**भूतप्रेतसमंधादि रोगव्याधि समस्तहि ।**
**नासती तुटती चिंता आनंदे भीमदर्शने ।।१५।।**
**हे धरा पंधरा श्लोकी लाभली शोभली बरी ।**
**दृढदेहो निसंदेहो संख्या चंद्रकळा गुणें ।।१६।।**
**रामदासी अग्रगण्यू कपिकूळासी मंडणू ।**
**रामरूपी अंतरात्मा दर्शने दोष नासती ।।१७।।**
**।। इति श्रीरामदासकृतं संकटनिरसनं मारुतिस्तोत्रं संपूर्णम् ।।**

श्री मारुती स्तोत्रातील हनुमान स्वरूपाने एक एक 'मराठा' अर्थात 'रामदास' निर्माण झाला की श्रींचे राज्य अर्थात रामराष्ट्र प्रकटते. जगद्गुरू तुकोबाराय आणि संत समर्थ रामदास स्वामी यांना अपेक्षित वैश्विक रामराष्ट्र श्री छत्रपती शिवरायांनी, शिवरायस्वरूप रामदास अर्थात मारुती वृत्तीने भोवतीच्या मावळ्यांना घेऊन; प्रस्थापित केले.

### (३७)

आक्रमकांनी ग्रासलेल्या भारतात वैश्विक रामराष्ट्र अवतरले, ते शिवछत्रपतींच्या आणि त्यांच्या स्वरूपात कार्यरत झालेल्या मावळ्यांच्या योगाने. 'हिंदवी स्वराज्य' हे अर्थातच हिंदू पदपादशाही म्हणून अवतरले. याचा अर्थ असा रामदास बाण्याने प्रकटलेल्या रामस्वरूप मराठ्यांनी वैश्विक रामराष्ट्र प्रकटविले. ह्या परिवर्तनाचे स्वरूप

**'सर्व सद्या, कळा विद्या । न भूतो न भविष्यति । वैराग्य जाहले सर्वें । आनंदवनभुवनी ।।५९।।'**



अशा प्रकारे सच्चिदानंदरूप होते. भक्तीने घडलेल्या ज्ञानात्मक कर्मपरतेने वैराग्य भावाने हे रामाने परिवर्तन घडविल्याचा भाव राजा आणि प्रजा यांच्या ठायी प्रकटला. ह्या समूहमनाने स्वात्मभावाने हे 'स्व'चे स्वराज्य स्थापित केले.

### (३८)

राष्ट्र ही मानसिक अवस्था आहे. सर्वाभूती राम या भावाने समूहमन रामस्वरूप झाले. म्हणूनच है सैद्धान्तिक दृष्ट्या म्हणजे वेदांतानुसार, वैश्विक रामराष्ट्र अवतरले हे खरे असले; तरी मानवी जीवनाचा व्यवहार केवळ मानसिक पातळीवर चालत नाही हा परमात्म्याची सृष्टीस्वरूपाने आविष्कृत झालेल्या, जगताचा स्वभाव आहे. हा जीवनव्यवहार भौतिक साधनसामग्री, मानवमात्रांचे परस्पर भौतिक तथा मानसिक संबंध यावर व्यवहारतः चालतो.

त्यासाठी एकात्मभावाने अर्थात वेदांत तत्त्वज्ञानाच्या लोकनिष्ठ अध्यात्मभावाने, कुटुंब, समाज, राज्य या पातळ्यांवर; शैक्षणिक, धार्मिक, आर्थिक, रामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, साधनसामग्री आणि खानपानविषयक, घरेदारे, शेतीपोती, व्यवसाय कौशल्ये या सर्व संबंधीचे, आनंददायक असे कलात्मक आविष्करण; अशा सर्व गोष्टींच्या संबंधाने, न्याय्य अर्थात समत्व दृष्टीने आणि सामरस्याने व्यवस्थापन आवश्यक असते.

हक्क आणि कर्तव्ये, स्वातंत्र्य आणि शिस्त, अशा सर्व गोष्टींसाठी शास्त्रीय व्यवस्थापनाची आवश्यकता असते. माणूस हा समूहशील प्राणी आहे.समूह म्हटला की समूहमनाचे एकात्मपण असणे आवश्यक होते. असे असले तरी प्राकृतिक स्वैरता प्रकटते. या स्वैरतेला नैतिक व्यवस्थापनाने सर्वहिताय, सर्वसुखाय रूप द्यावे लागते. यासाठी सम ूहमन-समत्वाने अर्थात अद्वैतभावाने हे व्यवस्थापन घडावे लागते.

संत समर्थ रामदासांनी या सर्व भौतिक गोष्टींचा रामभक्ती, रामदासपण आणि वैश्विक रामराष्ट्र उभारणी, यांशी संबंध जोडला. त्याचे धडे रामदासपदी जाण्याची साधना करणाऱ्यांसाठी ग्रंथरूपाने आणि प्रत्यक्ष समाजातील भ्रमंतीप्रसंगीच्या कीर्तन, प्रवचन आणि वर्तन या स्वरूपात दिले. प्रसंगी पत्रलेखन केले.

(३९)

छत्रपती शिवाजी महाराजांना गौरव करण्यासाठी लिहिलेले पत्र –

**निश्चयाचा महामेरू । बहुत जनांसी आधारू । अखंड स्थिताचा निर्धारू । श्रीमंत योगी ।।१।।**
**यशवंत कीर्तिवंत । सामर्थ्यवंत वरदवंद । पुण्यवंत नीतिवंत । जाणता राजा ।।४।।**
**आचारसील विचारसील । दानसील धर्मसील । सर्वज्ञपणें सुसील । सकळां ठाई ।।५।।**
**देव धर्म गो ब्राह्मण । करावयास संरक्षण । हृदयस्थ जाला नारायण । प्रेरणा केली।।८।।**
**या भूमंडळाचा ठाई । धर्म रक्षी ऐसा नाहीं । महाराष्ट्र धर्म राहिला काहीं । तुम्हांकरिता ।।१०।।**
**सर्वज्ञ मंडळी धर्ममूर्ती । सांगणे काय तयांप्रती । धर्मस्थापनेची कीर्ति । सांभाळली पाहिजे ।।१४।।**

असे पंधरा ओव्यांचे पत्र शिवछत्रपतींचे आदर्श शास्ता म्हणून श्रीरामस्वरूप चित्र उभे करते. याप्रमाणेच शिवरायांनी अनुग्रह घेतल्यानंतर वैश्विक रामराष्ट्र सांभाळणाऱ्या राजाचा 'राजधर्म'ही निरुपित केला आहे–

**आधीं मनुष्य वोळखावें । योग्य पाहुनि काम सांगावे । निकामी तरी ठेवावे । येकीकडे ।।४।।**
**अमर्याद फितवेखोर । त्यांचा करावा संव्हार । शोधिला पाहिजे विचार । यथातथ्य ।।७।।**
**न्यास सीमा उल्लंघू नये । उल्लंघिता होतो अपायू । न्याय नसता उपाये । होईल कैचा ।।१०।।**
**धुरे नें युद्धासी जाणें । अशी नव्हेत की राजकारणें । धुराच करोनि सोडणें । कित्येक लोक ।।१४।।**
**ऐसा प्रपंचाचा विवेक । स्वल्प बोलिलों कांहीयेक । येका मनोगते स्वामी विवेक असतां बरे ।।२०।।**

वीस ओव्यांच्या दीर्घ पत्रात राजधर्म सांगत असतांना अखेरीस मनात 'स्वामी विवेक' असावा असे सुचविले. स्वामी विवेक म्हणजेच ठायीच्या रामतत्त्वाचे स्मरण होय. ते असेल तर सर्व राजधर्म यशस्वी होतोच तो राजधर्मही श्रीरामचरणी अर्पावा. याच दृष्टीने 'हे तो 'श्रीं'चे राज्य' हे महाराजांचे बोल, त्यांच्यातील सत्यप्रेमकरुणा प्रदर्शित करतांनाच भक्ती ज्ञान वैराग्याची प्रतिती घडवतात.

'क्षात्रधर्म' सांगणाऱ्या पत्रात,

**'देव द्रोही तितुके कुत्ते । मारूनि घालावे परते । देवदास पावती फत्ते । यदर्थी संशयो नाही ।।१७।।**
**देव मस्तकीं धरावा । अवघा हलकल्लोळ करावा । मुलुख बडवा का बुडवावा । धर्मसंस्थापने साठी ।।१८।।'**

यांतील देव म्हणजे मनुष्य मात्रातील माणूसपण अर्थात 'राम'तत्त्व अर्थात अद्वैत स्वरूप आत्माराम होय. वैश्विक रामराष्ट्र चालनासाठी ही क्षात्रनीति आवश्यक आहे.

संत स्वामी रामदासांनी यासाठी मराठ्याने अर्थात रामराष्ट्र उभारण्यासाठी सिद्ध शुराला स्वामी अखंड सावधान असावे असा बोध करतात.

**येकांतीं चाळणा करावी । धारणा उदंड धरावी । नाना विचारणा करावी । अरिमित्रांची ।।३।।**
**इशारतीचें बोलों नये । बोलायाचें लिहों नये । लिहायचे सांगो नये । जबानीने ।।१२।।**

असा सावधपणाचा सल्ला स्वामी देतात. हाच संदेश स्वामींनी श्री संभाजी महाराजांस लिहिलेल्या पत्रात दिला आहे.

**'शिवरायास आठवावें । जीवित्व तृणवत मानावें । इहलोकीं परलोकीं राहावे । कीर्तीरूपें ।।१७।।**
**राजी राखतां जग । मग कार्यभागाचि लगबग । ऐसें जाणोनिया सांग । समाधान राखावे ।।९।।**
**सकल सुखांचा त्याग । करूनि साधिजे तो योग । राज्यसाधनाची लगबग । ऐसी असे ।।२०।।'**

(४०)

समर्थांचे वाङ्मय पाहता जुना दासबोध, करुणाष्टकें, रामायणातील सुंदरकांड व युद्धकांड, पंचीकरणादि अभंग, बारा ओव्या शतके, पूर्वारंभ, अंतर्भाव, आत्माराम, पंचमान, मानपंचक, जनस्वभावगोसावी, पंचसमासी, सप्तसमासी, सगुणधान, निर्गुणध्यान जुनाटपुरुष, षडरिपुनिरुपण, पंचीकरणयोग, मनाचे श्लोक, श्रीमत् दासबोध, इतर स्फुट प्रकरणें, काही ओवीबद्ध पत्रे, आरत्या असे आहे. त्याचे दोन भागात विभाजन करता येते. एक म्हणजे केवळ भक्तीपर आणि दुसरे म्हणजे भक्ती, ज्ञान, वैराग्यमार्गे वैश्विक राष्ट्रप्रबोधनपर. पू. स्वामी गोविंददेव गिरिजी महाराजांनी स्वामी रामदासांचा 'राष्ट्रगुरू' असा सार्थ गौरव केला आहे.

ऋषी, मुनी, संत अशा विभूतिमत्त्वांनी वेदांत लोकनिष्ठेने अर्थात लोकनिष्ठ अध्यात्मवादी भूमिकेने वैश्विक रामराष्ट्र उभारण्यासाठी प्रबोधन परंपरा ठेवली आहे हे येथे पाहात आहोत. या परंपरेत; रामदास, राम, रामराष्ट्र आणि रामराष्ट्र पुरुष अशी अथवा व्यवस्थापन ही प्रक्रिया, स्वामी समर्थ रामदासांनी स्पष्टपणे मांडली. अवघा मानवमात्र, रामदास व्हावा यासाठी, दासबोध, मनोबोध ह्या गोष्टी रामदासांनी व्यवस्थापनातील मानसशास्त्र स्वरूपात मांडल्या. 'राम'तत्त्वाचे जागरण वेदांत स्वरूपात केले. राम हा राष्ट्रपुरुष उभा करून; छत्रपती शिवाजी महाराज हे कलियुगातील वैश्विक रामराष्ट्र पुरुष म्हणून सर्वांसमोर मांडले. वैश्विक रामराष्ट्राचे स्वरूप आणि रामराष्ट्र व्यवस्थापनातील अपेक्षा, 'आनंदवनभुवन' या स्फुटातून मांडली.

सनातन हिंदूधर्मराष्ट्र पुनरुथ्थान करावयाचे म्हणजे 'आनंदवनभुवन' फुलवायचे. भारतीय राष्ट्र हे रामराष्ट्र म्हणून उभे करायचे ते हिंदवी स्वराज्य ध्येयाने आणि वैश्विक राष्ट्रभावनेने. यासाठी रामदासपण मनुष्यमात्राच्या ठिकाणी प्रकट व्हावे. असा प्रयत्न केला तरच आनंदवनभुवनचा अनुभव घेता येईल.

(४१)

आनंदवनभुवनाचे अर्थात वैश्विक रामराष्ट्राचे संकल्पचित्रच एकप्रकारे छत्रपती शिवरायांनी आपल्यासाठी उभे केले.

'आनंदवनभुवनी' या पद्यरचनेत पहिल्या एक ते अकरा ओव्यांमध्ये परकीय आक्रमणाने, भारतीयांची झालेली अवस्था वर्णन केली आहे. लोक गांजले किंकर्तव्यमूढ झाले, हे खरे असले तरी अंतरात्म्याची आर्त हाक या दुरितांतून, भवसागरातून पलिकडे जाण्याची असते. कधीतरी

या सर्व दुरितांचा विनाश करणारा आणि भवसागरात बुडणाऱ्या जनांचा उद्धार करणारा जनताजनार्दन, प्रभू राम, कृष्ण, हरि अवतार घेईल, याची खात्री असते. वेदांताच्या जीवनशैलीने सनातनपणे, मानवी व्यवहार सुरू असतांना; त्या व्यवहाराला बाधा आणणाऱ्या, स्वदेहिक वासना विकार आणि बाह्य विश्वातील स्वार्थांध, आक्रमक, शोषक शक्ती; या वेदानांतप्रणित जीवनशैलीचा विनाश करण्यास सरसावतात. आस्तिक समाज काही काळ हतबल, निःसहाय्य अशा स्थितीत गेल्याचा अनुभव करू लागतो हे खरे.

वेदांतप्रणित सच्चिदानंद स्वरूपाचे ठायीच असलेला आनंदवनभुवन अविनाशीपणे असतेच. देह आणि विपन्न परिस्थिती दोन्ही अशाश्वत आहे. अंतरीचे स्वसंवेद्य आद्य आत्मरूप सच्चिदानंदरूपाने शाश्वत आहे, या अविनाशी आस्तिकभावाची दृढता भारतीयांच्या जीवात्म्याचा स्थायीभाव आहे.

ते आस्तिक्य जागृत होते. सर्वाभूतीच्या रामतत्त्वाला साद घालते. याच वेदांत अनुभूतीने ठायीचे शाश्वत असे आत्मतत्त्वाचे सत्यप्रेम करुणापूर्ण 'आनंदवनभुवन' प्रत्येक ओवीच्या अखेरी गोवले आहे. दासबोधातील प्रत्येक ओवी नंतर किंवा मनाच्या श्लोकानंतर प्रत्येकवेळी श्रीराम जप करावा तसेच 'आनंदवनभुवन' हे पालुपद आहे. त्यात समर्थांनी वेदांत आणि व्यवहार यांची बेमालूम सांगड घातली आहे.

'आनंद' हा वेदांत आहे तर 'वनभुवन' ही सृष्टी आहे. मानवमात्र, जीवमात्र एवढेच नव्हे तर चराचरांचे अस्तित्व हे शिवशक्ती, विष्णुलक्ष्मी, ब्रह्ममाया यांच्या महातत्त्व आणि महाशक्ती यांच्या अस्तित्वाच्या प्राकट्यासारखे अद्वैताने म्हणजे स्वरूपसंबंधाने सिद्ध होते हे रामदासांना मनामनात दृढावयाचे आहे. आनंदवनभुवन निर्माण झाले की पुन्हा आनंदवनभुवनी विहार करणारे जन निवांत, निष्क्रीय, भोगी होण्याची शक्यता, पंचभौतिक देहाच्या स्वभावधर्माने घडण्याची शक्यता असते. हे लक्षात घेऊन आनंदवनभुवन अर्थात वैश्विक रामराष्ट्र शाश्वतपणे



अनुभवण्यासाठी 'अखंड सावधान' असावे लागते. ठायीची जागृत झालेली भक्ती, ज्ञान, वैराग्य ही अवस्था सतत जागृत ठेवायची असते तरच सत्यनिष्ठेने, प्रेमभावाने, सर्वाभूतीच्या कारुण्याने शाश्वत स्वरूपात मुळातच असलेले सच्चिदानंदरूप आनंदवनभुवन, शाश्वतपणे अनुभवता येईल. हेच स्वातंत्र्य, हेच समत्व, हे नराचा नारायण होणे, हेच ठायीच रामदासाचे रामस्वरूप होणे होय. हे संत समर्थ रामदासांना छत्रपती शिवराय आणि शिवराय स्वरूप मावळ्यांना सांगावयाचे आहे.

पहिल्या अकरा ओव्यात केलेले हतबलतेचे वर्णन असे–

**जन्मदुःखें जरादुःखें । नित्य दुःखें पुनःपुन्हा । संसार त्यागणें जाणें । आनंदवनभुवनीं ।।१।।**

**वेधलें चित्त जाणावें । रामवेधीं निरंतरीं । रागे हो वीतरागें हो । आनंदवनभुवनीं ।।२।।**

**संसार ओढितां दुःखें । ज्याचें त्यासीच ठाउकें । परंतु एकदां जावें । आनंदवनभुवनीं ।।३।।**

**न सोसे दुःख तें होतें । दुःख शोक परोपरीं । येकाकी येकदां जावें । आनंदवनभुवनीं ।।४।।**

**कष्टलों कष्टलों देवा । पुरे संसार जाहला । देहेत्यागासि येणें हो । आनंदवनभुवनीं ।।५।।**

**जन्म ते सोसिलें मोठें । अपाय बहुतांपरीं । उपायें धाडिलें देवें । आनंदवनभुवनीं ।।६।।**

**स्वप्नीं जें देखिलें रात्रीं । तें तें तैसेंची होतसे । हिंडतां फिरतां गेलों । आनंदवनभुवनीं ।।७।।**

**हे साक्ष देखिली दृष्टीं । किती कल्लोळ उठिले । विघ्नघ्ना प्रार्थिलें गेलों । आनंदवनभुवनीं ।।८।।**

**स्वधर्माआड जें विघ्नें । तें तें सर्वत्र उठिलीं । लाटिलीं कुटिलीं देवें । दापिलीं कापिलीं बहु ।।९।।**

**विघ्नाच्या उठिल्या फौजा । भीम त्यावरी लोटला । घर्डिलीं चिर्डिलीं रागें**

**। रडविलीं बडविलीं बळें ।।१०।।**
**हाकिलीं टाकिलीं तेणें । हांकबोंब बहु जाली । पुढे खतल्ल मांडिलें । आनंदवनभुवनीं ।।११।।**

'खौळले लोक देवाचे । मुख्य देव ची उठीला । कळेना काय रे होते । आनंदवनभुवनी' या बाराव्या ओवीत 'मुख्य देव ची उठीला' ह्या उल्लेखांतून प्रत्येक माणसाच्या ठायीचा जीवात्मा रामस्वरूप होऊन उठला. ठायीच आत्मस्वरूप जागृत झाले की देहवासनेचा संहार होऊन ज्ञान प्रकटते आणि कारुण्यभावाचा संचार होतो. सत्य, प्रेम, करुणेचा विजय होतो. मात्र या जीवात्मा परमात्मा अद्वैतासाठी अंतरात निकराचे युद्ध होते. हे जसे योग मार्गातील सत्य, तोच प्रसंग समग्र राजकीय, सामाजिक परिवर्तन प्रसंगी येतो. शाश्वतावर झालेले अशाश्वताचे उग्र आक्रमण, तेव्हढ्या विक्राळपणाने प्रकट होऊन; शाश्वताला परतवून लावावे लागते. रावणाचा विनाश करण्यासाठी प्रत्येक वानराला रामस्वरूप हनुमान म्हणून प्रकटावेच लागते आणि प्रभु रामचंद्रांना आदित्यहृदयस्तोत्रांचा पाठ करून; विश्वभस्म करणाऱ्या सौरशक्तीचा उपयोग करावाच लागला होता. तसाच 'कल्पांत मांडला मोठा' असे युद्ध मांडले गेले. याचे वर्णन समर्थांनी बारा ते एकतीस ओव्यांत वर्णिले आहे–

**खौळले लोक देवाचे । मुख्य देव ची उठीला । कळेना काय रे होतें । आनंदवनभुवनीं ।।१२।।**
**स्वर्गींची लोटली जेथें । रामगंगा महानदी । तीर्थासी तुळणा नाहीं । आनंदवनभुवनीं ।।१३।।**
**ग्रंथीं जे वर्णिली मागें । गुप्तगंगा महानदी । जळांत रोकडे प्राणी । आनंदवनभुवनीं ।।१४।।**
**सकळ देवांची साक्षी । गुप्त उदंड भुवनें । सौख्य च पावणें जाणें । आनंदवनभुवनीं ।।१५।।**
**त्रैलिक्य चालिले तेथें । देव गंधर्व मानवी । ऋषी मुनी महायोगी । आनंदवनभुवनीं ।।१६।।**
**आक्रा आक्रा बहु आक्रा । काये आक्रा कळेचिना । गुप्त ते गुप्त जाणावें । आनंदवनभुवनीं ।।१७।।**
**त्रैलोक्य चालिल्या फौजा । सौख्य बंदविमोचनें । मोहीम मांडली मोठी । आनंदवनभुवनीं ।।१८।।**
**सुरेश उठिला आंगें । सुरसेना परोपरी । विकटें कर्कशें यानें । शस्त्रप्राणी महावळी ।।१९।।**
**देव देव बहु देव । नाना देव परोपरीं । दाटणी जाहली मोठी । आनंदवनभुवनीं ।।२०।।**
**दिग्पती चालिले सर्वे । नाना सेना परोपरीं । वेष्टीत चालिले सकळै । आनंदवनभुवनीं ।।२१।।**
**मंगळें वाजतीं वाद्यें । माहांगणासमागमें । आरंभीं चालिला पुढें । आनंदवनभुवनीं ।।२२।।**
**राशभें राखिलीं मागें । तेणें रागेंची चालिला । सर्वत्र पाठीसीं फौजा । आनंदवनभुवनीं ।।२३।।**
**आनेक वाजतीं वाद्यें । ध्वनीकल्लोळ उठीला । छबीनें डोलती ढाला । आनंदवनभुवनीं ।।२४।।**
**विजई दीस जो आहे । ते दीसीं सर्व उठती । आनर्थ मांडला मोठा । आनंदवनभुवनीं ।।२५।।**
**देवची तुष्टला होता । त्याचे भक्तीस भुलला । मागुता क्षोभला दुखें । आनंदवनभुवनीं ।।२६।।**
**कल्पांत मांडला मोठा । म्लेंच दैत्य बुडावया । कैपक्ष घेतला देवीं । आनंदवनभुवनीं ।।२७।।**
**बुडाले सर्व ही पापी । हिंदुस्थान बळावलें । अभक्तांचा क्षयो जाला । आनंदवनभुवनीं ।।२८।।**

**पूर्वी जे मारिले होते । ते ची आतां बळावलें । कोपला देव देवांचा ।**
**आनंदवनभुवनीं ।।२९।।**
**त्रैलोक्य गांजिलें मागें । ठाऊकें विवेकीं जना । कैपक्ष घेतला रामें ।**
**आनंदवनभुवनीं ।।३०।।**
**भीम ची धाडिला देवें । वैभवें धांव घेतली । लांगूळ चालिलें पुढें ।**
**आनंदवनभुवनीं ।।३१।।**

या निकराच्या युद्धानंतर आनंदवनभुवन कसे प्रकट झाले याचे वर्णन ३२ ते ४४ ओव्यांत केले आहे. 'बुडाला औरंग्या पापी' या उल्लेखामधून स्वामी समर्थ रामदासांना केवळ तत्कालीन भारत आणि विशेषता महाराष्ट्र प्रदेश यांच्या इतिहासावर लक्ष केंद्रित करावयाचे नाही; तर अशाश्वताचा आक्रमणाला परतवून त्यांचा विनाश करण्यासाठी; ठायीच्या लोकमनातील शाश्वताला नरसिंह रूप घ्यावेच लागते हे सांगावयाचे आहे.

दशावतार हे जनताजनार्दनाच्या संघमनातील शाश्वत, अविनाशी अशा परमात्मतत्त्वाचे जीवात्म्याशी साधलेले अद्वैत आहे. असे साधले की 'औरंग्या'चा विनाश निश्चित! हीच गोष्ट रामस्वरूप झालेल्या शिवावतार छत्रपतींच्या रूपाने जनताजनार्दनाच्या मनातील रामस्वरूपाने घडवली. या निकराच्या युद्धानंतरचे वर्णन आहे. या आनंदवनभुवनाचा शाश्वतपणे अनुभव घेत राहावे हीच प्रत्येक माणसाची ठायीची उर्मी असते. त्यासाठी असे सत्वाचे जागरण होणे आवश्यक असते. 'शिवरायाचें आठवावें रूप । शिवरायांचा आठवावा प्रताप । शिवरायांचा आठवावा साक्षेप । भूमंडळी' असा उपदेश समर्थांनी पुढील पिढीला केला आहे. 'आनंदवनभुवन' निर्माण झाले. या आनंदवनभुवनाचे स्वरूप रामदास ३२ ते ४४ ओव्यांत पुढीलप्रमाणे करतात.

**येथून वाढिला धर्मु । रमाधर्म समागमें । संतोष मांडला मोठा ।**
**आनंदवनभुवनीं ।।३२।।**
**बुडाला औरंग्या पापी । म्लेंचसंव्हार जाहला । मोडलीं मांडलीं छेत्रें ।**
**आनंदवनभुवनीं ।।३३।।**
**बुडाले भेदवाही ते । नष्ट चांडाळ पातकी । ताडिले पाडिले देवें ।**
**आनंदवनभुवनीं ।।३४।।**
**गळाले पळाले मेले । जाले देशधडी पुढें । निर्मळ जाहाली पृथ्वी ।**
**आनंदवनभुवनीं ।।३५।।**
**उदंड जाहाले पाणी । स्नान संध्या करावया । जप तप अनुष्ठानें ।**
**आनंदवनभुवनीं ।।३६।।**
**नाना तपें पुरश्चर्णें । नानाधर्म परोपरीं । गाजली भक्ती हे मोठी ।**
**आनंदवनभुवनीं ।।३७।।**
**लीहीला प्रत्ययो आला । मोठा आनंद जाहाला । चढता वाढता प्रेमा ।**
**आनंदवनभुवनीं ।।३८।।**
**बंड पाषांड उडालें । शुद्ध आध्यात्म वाढलें । राम कर्ता राम भोक्ता ।**
**आनंदवनभुवनीं ।।३९।।**
**देवाळयें दीपमाळा । रंगमाळा बहुविधा । पुजीला देव देवांचा ।**
**आनंदवनभुवनीं ।।४०।।**
**रामवरदायिनी माता । गर्द घेउनी उठीली । मर्दिले पुर्वीचे पापी ।**
**आनंदवनभुवनीं ।।४१।।**
**प्रतेक्ष चालिली राया । मूळमाया समागमें । नष्ट चांडाळ ते खाया ।**
**आनंदवनभुवनीं ।।४२।।**
**भक्तांसी रक्षिलें मागें । आतांही रक्षिते पाहा । भक्तांसी दिधलें सर्वै ।**
**आनंदवनभुवनीं ।।४३।।**
**आरोग्य जाहाली काया । वैभवें सांडिली सीमा । सार सर्वस्व देवाचें ।**
**आनंदवनभुवनीं ।।४४।।**

वास्तविक पाहाता भक्तीने देव आणि भक्त यांची अद्वैत स्थिती निर्माण

होते. 'देव भक्त येक जाले । मिळाले जीव सर्वहि । संतोष पावले तेथे । आनंदवनभुवनीं ।।' असे घडले की 'सामर्थें यशकीर्ती । प्रतापें सांडिली सीमा । ब्रीदेंची दिधलीं सर्वें । आनंदवनभुवनीं ।।' असा आद्य स्वसंवेद्य आत्मरूपाचा सिद्धांत आहे हे संत समर्थ रामदास स्पष्ट करतात. म्हणजेच 'राम कर्ता राम भोक्ता' अशी ही प्रक्रिया असते, हे सांगतांना 'वेद तो मंद जाणावा' वेदातील ज्ञान ठायीच अद्वैताने प्रकटले की; वेदच आपण झालो, असे होते. वेदांचे शब्द सामर्थ्य मंदावते कारण ते ठायीच प्रकटते. तेच तर वेदांचे कार्य! हे स्वामी समजावून सांगतात. असे वेदांताचे निरुपण, अर्थात शाश्वत ज्ञान प्रसार ४५ ते ५५ ओव्यांत केला आहे.

**देव सर्वस्व भक्तांचा । देव भक्त दुजें नसे । संदेह तुटला मोठा । आनंदवनभुवनीं ।।४५।।**
**देव भक्त येक जाले । मिळाले जीव सर्व हि । संतोष पावले तेथें । आनंदवनभुवनीं ।।४६।।**
**सामर्थें यशकीर्तींचीं । प्रतापें सांडिली सीमा । ब्रीदेंची दिधलीं सर्वें । आनंदवनभुवनीं ।।४७।।**
**राम कर्ता राम भोक्ता । रामराज्य भुमंडळीं । सर्वस्व मीच देवाचा । माझा देव कसा ह्मणों ।।४८।।**
**हें ची शोधुनी पाहावें । राहावें निश्चळीं सदा । सार्थक श्रवणें होतें । आनंदवनभुवनीं ।।४९।।**
**वेदशास्त्र धर्मचर्चा । पुराणें माहात्में किती । कवित्वें नूतनें जीर्णें । आनंदवनभुवनीं ।।५०।।**
**गीत संगीत सामर्थ्यें । वाद्यकल्लोळ उठीला । मिळाले सर्व आर्थार्थी । आनंदवनभुवनीं ।।५१।।**
**वेद तो मंद जाणावा । सीद्ध आनंदभुवनी । आतुळ महिमा तेथें । आनंदवनभुवनीं ।।५२।।**



**मनासी प्रचीत आली । शब्दीं विश्वास वाटला । कामना पुरती सर्वै । आनंदवनभुवनीं ।।५३।।**
**येथून वांचती सर्वै । ते ते सर्वत्र देखती । सामर्थ्य काय बोलावें । आनंदवनभुवनीं ।।५४।।**
**उदंड ठेविलीं नामे । आपस्तुतीच मांडिली । ऐसें हें बोलणें नाहीं । आनंदवनभुवनीं ।।५५।।**

'बोलणे वाऊगें होतें । चालणें पाहिजें बरें । पुढें घडले तें खरें । आनंदवनभुवनी ।।' आनंदवनभुवन घडामोडींची प्रक्रिया आहे. ही प्रक्रिया केवळ शब्दाने समजावून घेता कामा नये. या प्रक्रियेप्रमाणे अखंड सावधान होऊन व्यवहार घडला पाहिजे. अर्थात ठायी राम आणि रामदास हनुमान यांची अखंड भक्तिसाधना घडली पाहिजे, तर पुढेही आनंदवनभुवन अनुभवता येईल; हे सांगून समर्थांनी शिवरायांना आणि शिवरायस्वरूप मावळ्यांना, म्हणजे ठायीच्या 'राम'तत्त्वाला जागृत करणाऱ्या साधकाला बजावले आहे! भविष्यकाळासाठी छत्रपती शिवरायांनी उभारलेले हिंदवी स्वराज्य म्हणजे 'आनंदवनभुवन' निर्मिती साधनेचे विद्यापीठ आहे हेही मोठ्या गौरवाने स्वामी रामदासांनी सांगितले आहे.

**बोलणें वाऊगें होतें । चालणें पाहिजे बरें । पुढें घडेल तें खरें । आनंदवनभुवनीं ।।५६।।**
**स्मरले लिहिलें आहे । बोलता चालता हरी । काय होईल पाहावें । आनंदवनभुवनीं ।।५७।।**
**महिमा तो वर्णवेना । विशेष बहुतांपरीं । विद्यापीठ तें आहे । आनंदवनभुवनीं ।।५८।।**
**सर्वसद्या कळा विद्या । न भूतो न भविष्यति । वैराग्य जाहालें सर्वै । आनंदवनभुवनीं ।।५९।।**

## (४२)

आनंदवनभुवनाला पुन्हा साम्राज्यवाद्यांची दृष्ट लागली. ब्रिटिशांनी भारत ताब्यात घेतला. मॅक्सम्युल्लरने तर भारतीय संस्कृतीचे, रामराष्ट्राचे प्राचीनत्व दृढमुलत्व आणि महत्त्व ओळखून; वैश्विक रामराष्ट्रावर, हल्ला चढविण्याचा सल्ला लॉर्ड मेकाले यांना अर्थात ब्रिटिशांना दिला. अवघे जीवन, अर्थात तन आणि मन, भाषा आणि संस्कृती, धर्म आणि तत्त्वज्ञान सारेच लयाला जाण्याचा प्रसंग!

याहीपरिस्थितीतनिकराने 'राम'तत्त्वाचे जागरण करण्याचा प्रयत्न करणारे होतेच. या भूमंडळाच्या ठायी । धर्म रक्षी ऐसा नाहीं । महाराष्ट्र धर्म राहिला कांही । तुम्हां करिता ।। या रामदासांच्या संदेशाने, रामदासपण रामस्वरूप होण्यासाठी जपणारे छत्रपती स्वरूप शिवतेजस्वी भारतात होतेच. त्यांनी सत्त्व जागरणाचा खटाटोप गत शतके चालू ठेवला आहे.

त्यातही धर्मालाच तिलांजली देऊन; केवळ भौतिक सुधारणांच्या बुद्धिप्रामाण्यवादी भूमिकेने, इंग्रजाळलेल्यांच्या असा, तथाकथित सुधारणावाद्यांचा किंवा धर्मनिरपेक्षतावाद्यांचा मोठा वर्ग आहेच. ब्रिटिश सरकारला जाता जाता असा बुद्धिभेद साधण्यात यश आले! परतंत्र झालेल्या अर्थात गुलाम झालेल्या मनाने वावरणाऱ्या तथाकथित धर्मनिरपेक्ष, पुरोगामी; अर्थात वैश्विकतेच्या दांभिकतेत स्वराष्ट्रालाच मानवताभ्रष्ट ठरविणाऱ्या; सत्य, प्रेम, करुणेने पूर्ण सहिष्णू वृत्तीने 'विष्णूमय जग' धारणेने महान-राष्ट्रधर्माचे जागरण करणारांनाच असहिष्णू, मानव हक्क विरोधी ठरविणाऱ्यांचा, आक्रस्ताळा, स्वार्थांध शोषकांचा वर्ग गत दीडशे वर्षे कार्यरत आहेच. रामदासांचा विनाश करण्याच्या खटपटीत तो सरसावलाच आहे. यात भरीला म्हणजे, रामराष्ट्राला छिन्नभिन्न करून; आपण या वैश्विक रामराष्ट्राचे मालक आहोत असे म्हणविणारे, रामराष्ट्र विच्छेदक, कट्टरपंथी, धर्ममतसाम्राज्यवादी; तथाकथित धर्मप्रसार आणि धर्मरक्षणांच्या नावाखाली, भारतीय स्वातंत्र्यानंतर, आतंकाने, हक्क गाजवीत, रामराष्ट्राचा संहार करण्याचा अश्लाघ्य प्रयत्न, भ्रष्टाचारी मार्गाने करीत आहेत. या गोष्टींना धर्मनिरपेक्षतेच्या नावाने दांभिक प्रेमाने साद घालीत, तुष्टीकरणाच्या मार्गाने, क्षणकालाच्या सत्तालोलुपता आणि अर्थलोलुपता यांसाठी, राजसत्ता भोगत; 'आनंदवनभुवन' निर्मितीला पारखे करण्याचा उद्योग, राजकारणाच्या कुटीलतेची कास धरून करीत आहेत.

हे लक्षात घेऊन, 'महाराष्ट्रधर्म राहिला काही', याचा विचार करून; त्या महाराष्ट्र धर्मसाधकांना अर्थात रामदासांना संघटित करून; 'आनंदवनभुवन' अर्थात 'वैश्विक रामराष्ट्र' उभारावे; या तेजस्वी, दृढ निश्चयाने कटिबद्ध होऊन अनेक रामदास 'राम'तत्त्वाचे, मनामनात जागरण करीत आहेत.

या वैश्विक रामराष्ट्राचे जागरण करण्याचा गतशतकातील द्रष्टा पुरुष म्हणजे स्वामी विवेकानंद! गत दीडशे वर्षात लोकमान्य टिळक आणि तत्सम, महात्मा गांधी आणि स्वातंत्र्यवीर सावरकर आणि तत्सम महामनांनी रामराष्ट्र जागरणाचे निकराचे प्रयत्न केले आहेत. त्याच मार्गाने अनेक रामदासस्वरूप साधक, व्यक्तिगत पातळीवर, आदर्श रामदास हनुमान आणि वैश्विक रामराष्ट्रपुरुष, राम धर्मकृष्ण, यांचे आराधन करीत आहेत. भागवतधर्म अनुयायी वारकरी, धर्मसंसद यांसारखे 'राम' मनोस्वरूपाने जगणारे, 'राम'तत्त्वाचे जागरण करणाऱ्या असंख्य शिक्षण संस्था, मंडळ्या, यांचे कार्य सुरू आहेच. या सर्व प्रयत्नांमध्ये, १९२५ मध्ये डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांनी स्थापन केलेला 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघ', गत शंभर वर्षे सर्व क्षेत्रांत, रामदासांचा परिवार उभा करून; रामदासपणाने राष्ट्रसेवारत आहे.

मोठा आकांत मांडावा लागतो आहे! त्यातील विजयाचे पहिले पाऊल म्हणजे, अयोध्येतील राममंदिर होय! अयोध्येतील राममंदिर, हे एकविसाव्या शतकातील 'वैश्विक रामराष्ट्र' निर्माणाचे, अर्थात सनातन हिंदूधर्मराष्ट्र जागरणाचे; बोधचिन्ह आहे. हे बोधचिन्ह मनामनातील 'राम'

जागवील आणि 'आनंदवनभुवन' अर्थात रामदासांचे वैश्विक रामराष्ट्र, अखंड हिंदुस्थान रूपाने, विश्वाला कवेत घेण्यासाठी, सत्य प्रेम करुणा भावाने सरसावेल यात तीळमात्र शंका नाही!

* * *